तुकाराम गाथा
भाग १

गा ...

ळ हा ग्रंथ लो
र्ती तर हें पुस्तक
क सद्गृहस्थांनी
सदर गाथ्याची
निमित्त दरानें

भाग पहिला.

(अभंग १ पासून १९६७ पर्यंत.)

शालिवाहन शके १८०६, तारणनामसंवत्सरे,

आषाढमास.

आवृत्ति दुसरी.

मुंबईंत

...णपत कृष्णाजी यांच्या छापखान्याचे मालक आत्माराम कान्होबा
यांणीं छापून प्रसिद्ध केला.

श्री

प्रस्तावना.

(दुसऱ्या आवृत्तीची.)

या पुस्तकाची पहिली आवृत्ति संपल्यामुळें हा ग्रंथ लोकांस फार दुर्मिल झाला होता इतकेंच नाहीं तर हें पुस्तक आपणास लौकर छापून मिळावें अशी कित्येक सद्गृहस्थांनी आपली इच्छा आह्मास प्रदर्शित केल्यावरून सदर गाथ्याची ही दुसरी आवृत्ति लोकोपयोगाकरितां छापून नेमस्त दरानें प्रसिद्ध केली आहे.

मुंबई आशाढमास }
शा० शके १८०६ }

॥ श्रीविठ्ठल ॥

श्रीविठ्ठलायनमः श्रीपांडुरंगायनमः श्रीरामकृष्णाय नमः श्रीतुकारामायनमः श्रीगुरुपरंपरा श्रीराघवचैतन्य श्रीकेशवचैतन्य श्रीबाबाजीचैतन्य श्रीगुरुमंत्र रामकृष्णहरि ॥

अभंगप्रारंभः

समचरणदृष्टिविटेवरिसाजिरि ॥ तेथेमाझीहरिवृत्ति राहो ॥ १ ॥ अणिकनलगेमायिकपदार्थ ॥ तेथेमाझे आर्तनकोदेवा ॥ २ ॥ ब्रह्मादिकपदेंदुःखाचीशिराणी ॥ तेथेदुश्चितझणीजडोदेशी ॥ ३ ॥ तुकाह्मणेत्याचेंकळलेंआम्हांवर्म ॥ जेंजेंकर्मधर्मनाशिवंत ॥ ४ ॥

सुंदरतेंध्यानउभेंविटेवरी ॥ करकटावरीठेवूनीयां ॥ १ ॥ तुळसीहारगळांकासेपीतांबर ॥ आवडेनिरंतरहेंचिध्यान ॥ २ ॥ मकरकुंडलेंतळपतिश्रवणीं ॥ कंठींकौस्तुभमणिविराजित ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझेंहेंचिसर्वसुख ॥ पाहीनश्री[illegible]आवडीनें ॥ ४ ॥

॥ बाळक्रीडाप्रारंभः ॥

देवाआधिदेवाजगत्रयाजीवा ॥ पर्येशीकेशवावाणी
माझी ॥ १ ॥ माझीवाणीतुझेवर्णीगुणनाम ॥ ऐसेंदे
ईप्रेमकांहींकळा ॥ २ ॥ कळातुजपाशींआमुचेंजीव
न ॥ उचितकरोनदेईआह्मा ॥ ३ ॥ आह्माशरणागता
तुझाचीआधार ॥ तूंतवसागरकृपासिंधु ॥ ४ ॥ सिंधु
पायवाटहोयतुझेंनाम ॥ जाळीमहाकर्मदुस्तरतें ॥ ५ ॥
तेंफळउत्तमतुझनिजध्यास ॥ नाहींगर्भवाससेवीली
या ॥ ६ ॥ सेविलीयारामकृष्णनारायण ॥ नाहींत्याबं
धनसंवसार ॥ ७ ॥ संसारतोकायतृणवतमाये ॥ अ
ग्नित्यासिखायेक्षणमात्रें ॥ ८ ॥ क्षणमात्रेंजाळीदोषा
चीयाराशी ॥ निंद्यउत्तमाशीवंद्यकरी ॥ ९ ॥ करींब्रीदें
साचआपुलींआपण ॥ पतीतपावनदीनानाथ ॥ १० ॥
नाथअनाथाचापतीगोपीकांचा ॥ पुरवीशीवाचाम
नोरथ ॥ ११ ॥ चित्तींजेंधरावेंतुकाह्मणेदासीं ॥ पुरवि
ताहांसीमनोरथ ॥ १२ ॥ ॥ १ ॥

मनोरथजैसेगोकुळींच्याजना ॥ फेडावीवासनातया
परी ॥ १ ॥ रुणफेडावयाअवतारकेला ॥ अविनाश
आलाआकारासी ॥ २ ॥ शिणझालावसुदेवदेवकी
सी ॥ बांधीबाळेंकंसदुराचारी ॥ ३ ॥ दुराचारीयासीना

हीं भूतदया ॥ आपपरतयापापपुण्य ॥ ४ ॥ पुण्यकाळ
त्याचाराहीलासेउभा ॥ देवकीच्यागर्भादेव आले ॥ ५॥
गर्भासीतयाच्याआलानारायण ॥ तुटलेंबंधनआपें
आप ॥ ६ ॥ आपेंआपवेड्यातूटल्याश्टंखला ॥ बंधाच्या
अर्गळाकुल्येंकोंडे ॥ ७॥ कोंडमारकेलाहोतावहूदीस ॥
सोडवीनिमिषनलागतां ॥ ८ ॥ नकळेतोतयासांगी
तलाभावो ॥ आपणासीठावोनंदाघरीं ॥ ९ ॥ नंदाघरीं
जातांयेतांवसुदेवा ॥ नाहींझालागोवांसवेंदेव ॥ १० ॥
सवेंदेवतयाआडनयेकांहीं ॥ तुकाह्मणेनाहींभयचिं
ता ॥ ११ ॥ ॥ २ ॥
चिंतातेपळालीगोकुळाबाहेरी ॥ प्रवेशभीतरींकेलादे
वें ॥ १ ॥ देवआलाघरानंदाचीयागांवा ॥ धन्यत्यांच्या
दैवादेवआले ॥ २ ॥ आलेअविनाशधरोनीआकार ॥
दैत्यांचासंहारकरावया ॥ ३ ॥ करावयाभक्तजनाचें
पाळण ॥ आलेरामकृष्णगोकुळासी ॥४॥ गोकुळींआ
नंदप्रगटलेंसुख ॥ निर्भयतेलोकघरोघरीं ॥ ५ ॥ घरो
घरींझालालक्षुमीचावास ॥ दैन्यदारिद्रासत्रासआ
ला ॥ ६ ॥ आलानारायणतयाच्याअंतरा ॥ दयाक्षमा
नरानारीलोकां ॥ ७ ॥ लोकांगोकुळीच्याझालेंब्रह्मज्ञा
न ॥ केलीयावांचूनजपतप ॥ ८ ॥ जपतपकायकरावीं
साधनें ॥ जेव्हांनारायणेंकृपाकेली ॥ ९ ॥ केलीनाराय
णेंआपलींअंकित ॥ तोचित्यांचेंहितसर्वजाणे ॥ १० ॥

सर्वजाणएकविष्णुसाचखरा ॥ आणीकदुसरानाहीं
नाहीं ॥ ११ ॥ नाहींभक्तादूजेंतिहींत्रिभुवनीं ॥ एका
चक्रपाणीवांचूनीयां ॥ १२ ॥ त्यांच्यासुखासवें घेतो
गर्भवास ॥ तुकाह्मणेआसत्यजोनीयां ॥ १३ ॥ ३ ॥
त्यांच्यापूर्वपुण्याकोणलेखाकरी ॥ जिहींतोमुरारीखे
ळविला ॥ १ ॥ खेळविलाजीहींअंतर्बाह्यसुखें ॥ मेळ
वूनिमुखेंचुंबवूनी ॥ २ ॥ चुंबवूनीसुखअंतरींचेंदेवें ॥
जिहींएकाभावेंजाणीतला ॥ ३ ॥ जाणीतलातिहींका
मातुरानारी ॥ कृष्णभोगावरीचित्तजांचें ॥ ४ ॥ जांचें
कृष्णींतनमनझालेंरत ॥ गृहपतिसुतविसरल्या ॥ ५ ॥
विषतयांझालेंधनमानजन ॥ वसवितिवनएकांतत्या
॥ ६ ॥ एकांतींत्याजातीहरीसीघेऊनी ॥ भोगइच्छा
धणीफेडावया ॥ ७ ॥ वयाच्यासंपन्नतैसेंत्यांकारणें ॥
अंतरींचेंदेणेंइच्छाभोग ॥ ८ ॥ भोगत्यागदोन्हीनाहीं
जयापाशीं ॥ तुकाह्मणेजैसीस्फटिकसीळा ॥ ९ ॥ ४ ॥
स्फटिकांचीशीळानपालटेभेद ॥ दावूनीयांछंदजैसी
तैसी ॥ १ ॥ जैसाकेलातैसाहोयक्षणक्षणा ॥ फेडावी
वासनाभक्तीभावें ॥ २ ॥ फेडावयाआलाअवघियां
चाधणी ॥ गोपाळगौळणीमायबाप ॥ ३ ॥ मायबा
पसोडविलेबंदीहूनी ॥ चाणूरमर्दूनीकंसादिक ॥ ४ ॥
दिक्नाहींदेणेंआरिमित्राएक ॥ पूतनाकंटकमुक्तकेली
॥ ५ ॥ मुक्तकेलामामाकंसमहादोषी ॥ बालहत्यारासी
पावकांच्या ॥ ६ ॥ पापकोठेराहेहरिआठवीतां ॥ भक्ति

द्वेषचिंताजैशातैशी ॥ ७ ॥ साक्षीतयापाशींपूर्वीलक
र्मांचा ॥ बांधलासेवेचाकृणदेव ॥ ८ ॥ देवभोळाधां
वेभक्तापाठोपाठीं ॥ उच्चारितांकंठींमागेंमागें ॥ ९ ॥
मानाचाकंटाळातुकाह्मणेत्यासी ॥ धांवतोघरासीभा
वीकांच्या ॥ १० ॥ ॥५॥
चारिवेदज्याचीकीर्तिवाखाणीती ॥ बांधवीतोहातीं
गौळणीच्या ॥ १ ॥ गौळणीत्यागळांबांधितीधारणीं ॥
पायांचक्रपाणीलागेतयां ॥ २ ॥ तयांघरींरिघेचोराव
यालोणी ॥ रितेंपाळतोनीशिरेमाजी ॥ ३ ॥ माजिशि
रोनियांनवनीतखाये ॥ कवाडतेंआहेजैसेंतैसें ॥ ४ ॥
जैसातैसाआहेअंतर्बाह्याकारीं ॥ ह्मणऊनीचोरींनसां
पडे ॥ ५ ॥ नसांपडेतयांकरितीखटपट ॥ वाउगेंचो
भाटवर्मांविणें ॥ ६ ॥ वर्मजाणतीत्याएकलाएकटा ॥
बैसतीलवाटानिरोधोनी ॥ ७ ॥ निवांतराहिल्यानिःसं
गहोऊनि ॥ निश्चळत्यामनींकृष्णध्यानें ॥ ८ ॥ नये
क्षणभरीयोगियांचेध्यानीं ॥ धरितीगौळणीभाविका
त्या ॥ ९ ॥ भाविकातयांसीयेतोकाकुळती ॥ शाहा
ण्याह्मणतीनसांपडे ॥ १० ॥ नलगेवेचावेंटोलीधन
नावें ॥ तुकाह्मणेभावचाडएक ॥ ११ ॥ ॥ ६ ॥
चाडअनन्याचीधरीनारायण ॥ आपणासमानकरीरं
क ॥ १ ॥ रंकहोतीराजेयमाचियाघरीं ॥ आचरणेंबरें
नाहींह्मण ॥ २ ॥ नसांपडेइंद्रचंद्रब्रह्मादिकां ॥ अभिमा
नएकातिळमात्रें ॥ ३ ॥ तिळमात्रजरीहोयअभिमान

मेरूतोसमानभारदेवा ॥ ४ ॥ भारपृथुवीचावाहीलास
कळ ॥ 'जडहोतीखळदुष्टलोक ॥ ५ ॥ दुष्टअभक्तजेनि
ष्ठुरमानसी ॥ केलीहेतयांसीयमपूरी ॥ ६ ॥ यमदूतत्यां
सीकरीतीयातना ॥ नाहींनारायणाभजिलेजे ॥ ७ ॥
जेनाहींभजीलेएक्याभावेहरी ॥ तयांदंडकरीयमधर्म
॥ ८ ॥ यमधर्मह्मणेतयादोषियांसी ॥ कारेकेशवासी
चूकलेती ॥ ९ ॥ चूकलेतीकथापुराणश्रवण ॥ होतेतु
ह्माकानडोळेमुख ॥ १० ॥ कानडोळेमुखसंताचीसंग
ती ॥ नधराचिचित्तींसांगीतलें ॥ ११ ॥ सांगीतलेंतुह्मा
संतींउघडूनी ॥ गर्भासीयेवोनीयमदंड ॥ १२ ॥ दंडों
आह्मीरागेंह्मणेयमधर्म ॥ देवाहोयश्रमदुर्जनाचा ॥
॥ १३ ॥ दुर्जनाचायेणेकरोनिसंव्हार ॥ पूर्णअवताररा
मकृष्ण ॥ १४ ॥ रामकृष्णनामींरंगलेजेनर ॥ तुकाह्मणे
घरवैकुंठीत्या ॥ १५ ॥ ॥ ७ ॥
वैकुंठीच्यालोकांदुर्लभहरिजन ॥ तयांनारायणसमा
गमं ॥ १ ॥ समागमत्यांचाधरिलाअनंतें ॥ जीहींचित्त
वित्तसमर्पिले ॥ २ ॥ समर्थतेगातीहरीचेपवाडे ॥ येरते
बापुडेरावराणे ॥ ३ ॥ रामकृष्णेंकेलेंकौतुकगोकुळीं ॥
गोपाळांचेमेळींगाईचारी ॥ ४ ॥ गाईचारीहरिपावा
वाजेपाठी ॥ धन्यझालीकाठीकांबळीते ॥ ५ ॥ कायगौ
ळियांच्याहोत्यापुण्यराशी ॥ आणिकत्याह्मैशीगाईप
शू ॥ ६ ॥ सुखतेंआमूपलुटीलेंसकळीं ॥ गोपिकागोपा
ळींधन्नीवरि ॥ ७ ॥ धन्नीवरित्यानींसांगीतलीमात ॥ ज्या

च्येंजैसेंआर्ततयापरि ॥ ८ ॥ परित्याचेंतुह्मीआईकानव
ल ॥ दुर्गमजोखोलसाधनासी ॥ ९ ॥ शिकलऊनीयां
घालितीबाहेरी ॥ पाहातीभितरींसर्वेचितो ॥ १० ॥ तों
डाकडेपाहेत्यांच्याकवतुकें ॥ शिव्यादेतांसुखेंहांसतसे
॥ ११ ॥ हांसतसेशिव्यादेतांत्यागौळणी ॥ मरतांजप
ध्यानींनबोल्लेतो ॥ १२ ॥ तोजेंजेंकरीलतेंदिसेंउत्तम ॥
तुकाह्मणेवर्मदावीसोपें ॥ १३ ॥ ॥ ८ ॥
वर्मदावीसोपेंभाविकांगोपाळां ॥ वाहेत्याच्यागळांपा
लमाळा ॥ १ ॥ मानदेतीआधींमागतीलडाव ॥ देवा
तेंगौरवमानीसूख ॥ २ ॥ मानीतातिमंत्रह्मामाङ्कुबरी ॥
सितोडितिवरीस्नानतेणें ॥ ३ ॥ वस्त्रेंघोंगडियाघालो
नियांतळीं ॥ वरिवनमाळीबैसवीती ॥ ४ ॥ तिहींलोकां
सीजोदुर्लभाचिंतन ॥ तोधांवेगोधनावळवाया ॥ ५ ॥
त्यांच्यावचनाचींपुष्पेंवाहेशिरीं ॥ नैवेद्यत्याकरीकवळ
मागे ॥ ६ ॥ त्याचियामुखींचेंहिरोनियांघ्यावें ॥ उच्छि
ष्टतेंखावेंधणीवरी ॥ ७ ॥ वरिमाथांगुंफमोरपिसांवेष्टी
नाचेटाळीपिटीत्यांच्याछंदें ॥ ८ ॥ छंदेंनाचतीलजया
सवेंहरि ॥ देहभावावरीविसरल्या ॥ ९ ॥ विसरल्याव
रिदेहाचीभावना ॥ हेचिनारायणासर्वपूजा ॥ १० ॥ पू
जाभाविकांचीनकळतांघ्यावी ॥ नमागतांद्यावीनि
जठाव ॥ ११ ॥ ठावपाहावयाहिंडेमागेंमागें ॥ तुकाह्मणे
संगें भक्तांचीया ॥ १२ ॥ ॥ ९ ॥
भक्तजनादिल्हेंनिजसुखदेवें ॥ गोपिकात्याभावें आळं

गिल्या ॥ १ ॥ आळंगिल्यागोपीगुणवंतानारी ॥ त्यां
च्याजन्मांतरींहरिऋणी ॥ २ ॥ रुसलीयात्यांचेंकरीस
माधान ॥ करविताआपणक्रियाकरी ॥३॥ क्रियाकरी
तुह्मानवजेपासून ॥ अवघियाजणिगोपिकांसी ॥ ४ ॥
गोपिकांसिह्मणेवैकुंठिचापति ॥ तुह्मीमाझेचित्तींसर्व
भावें ॥ ५ ॥ भावजैसातुह्मीमाझेठाईंधरा ॥ तैसाचिमी
खरातुह्मांलागीं ॥ ६ ॥ तुह्मांसिकळोंद्यामाझासाचभा
व ॥ तुमचाचिजीवतुह्मागोही ॥ ७ ॥ गोहीतुह्माआह्मा
असेनारायण ॥ आपुलीचआणवाहातसे ॥ ८ ॥ सत्य
बोलेदेवभक्तिभावजैसा ॥ आणूनिसरिसाअनूभव ॥
॥ ९ ॥ आणिबूझावीतोवेगळालेभावें ॥ एकीचेंहेठावें
नाहींएकी ॥ १० ॥ येकक्रियानाहींअवघियांचाभा
व ॥ पृथकहादेवदेतोतैसा ॥ ११ ॥ तैसाकळोंनेदीजोमी
कोठेंनाहीं ॥ अवघियांचेठाईंजैसातैसा ॥ १२ ॥ जै
सामनोरथजयाचित्तींकाम ॥ तैसामेघश्यामपुरवीतो
॥ १३ ॥ पुरवितोमनोरथगोपीकांचे ॥ आणिकलोकां
चेगोकुळींच्या ॥ १४ ॥ गोकुळींच्यालोकांलावियेले
छंद ॥ बैसलागोविंदत्यांचेचित्तीं ॥ १५ ॥ चित्तेंचोरो
नियांघेतलींसकळ ॥ आवडीगोपाळावरितयां ॥ १६ ॥
तयांसिआवडेवैकुंठनायक ॥ जेवींसकळीकविसरो
नि ॥ १७ ॥ निंदास्तुतिकोणीनकरीकोणाची ॥ नाहीं
यादेहाचीशुद्धिकोणा ॥ ॥ १८ ॥ कोणासिनाठवेक
न्यापुत्रमाया ॥ देवह्मणोनियांचुंबनदेती ॥ १९ ॥ दे

तीत्याटाकोनीभ्रतारासिघरीं ॥ लाजतेअंतरींआथी
चना ॥ २० ॥ नाहींधाककोणाकोणासीकोणाचा॥
तुकाह्मणेवाचाकायामनें॥ २१॥ ॥ १०॥
मनेहरिरूपींगुंतल्यावासना॥ उदासत्यासुनागौळीयां
च्या॥ १॥ त्यांचेभ्रतारांचींधरोनियांरूपें॥ त्यांचेघरीं
त्यापेंभोगकरी ॥ २॥ करीकवतूकत्यांचेंतयापरी॥ ये
कादींसेहरियेकालेक ॥ ३ ॥ एकनाहींभावसकळांचे
चित्तीं॥ ह्मणऊनिप्रीतितैसेंरूप ॥ ४ ॥ रूपयाचेंआहे
अवघेंचिएक॥ परिकवतुकदाखविलें॥ ५॥ लेंकरूंन
कळेस्थूळकींलहान ॥ खेळेनारायणकवतुकें ॥ ६ ॥
कवतुकेंकेलेंसोंगबहुरूप॥ तुकाह्मणेबापजगाचाहा॥
॥ ७॥ ॥ ११॥
जगाचाहाबापदाखविलेंमाये॥ मातीखातांजायेमा
रावया ॥ १॥ मारावयातीनेंउगारीलीकाठी ॥ भुवने
त्यापोटींचवदादेखे ॥ २ ॥ देखेभंयानकझांकीयेलेडो
ळे॥ मागुतातोखेळेतीयेपुढें॥ ३॥ पुढेंरिघोनीयांगळां
घालीकव ॥ कळोंनेदीमावमायावंत ॥ ४॥ मायावंत
हरिरूपकायजाणे॥माझेंमाझेंम्हणेंदेवाबाळ॥५॥बा
ळपणींरीठारगडीलादाढे॥मारीयेलेगाढेकागबग॥६
गळाबांधोनीयांउखळासिदावें ॥ उन्मळीलेभावेंविम
ळार्जुन॥ ७॥ नकळेजूनाटजगाचेंजीवन॥ घातलेंमो
हनगौळीयांसी ॥ ८ ॥ शिंकींउतरोनीखायेनवनीत॥

नकळेबहुतहोयतरी ॥ ९ ॥ दहींदूधडेरेभरीलेरांझण ॥ खायतेभरूनदावीदुणी ॥ १० ॥ दुणीझालियाचामा नीतीसंतोष ॥ दुभत्याचीआसधरोनीयां ॥ ११ ॥ आ शाबद्धादेवअसोनीजवळी ॥ नेणतीत्याकाळींस्वार्था मुळें ॥ १२ ॥ मुळयाचादेवनकळेतयांसी ॥ चित्तआ शापाशींगोवीयेले ॥ १३ ॥ लेंकरूंआमूचेह्मणेदसवंती नंदाचियाचित्तींतोचीभाव ॥ १४ ॥ भावदावावयाच रित्रदाखवी ॥ घुसळीतांरवीडेरीयांत ॥ १५ ॥ डेरियां तलोणीखादलेरिघोनी ॥ पाहेतोजननीहातींलागे ॥ ॥ १६ ॥ हातींधरोनियांकाढिलाबाहेरी ॥ देखोनियांकरी चोजत्यासी ॥ १७ ॥ शिकवीविचारनेणेत्याचीगति ॥ होताकोणेरीतिडेरीयांत ॥ १८ ॥ यांसीपुत्रलोभेनकळे हाभाव ॥ कळोनेदीमावदेवत्यांसी ॥ १९ ॥ त्यांसीमा यामोहजाळघालीफांसा ॥ देवआपणसाकळोनेदी ॥ ॥ २० ॥ नेदीभावराहोलोभिकाचेचित्तीं ॥ जाणतांचि होतीआंधळेते ॥ २१ ॥ आंधळेतेतुकाह्मणेसंवसारीं ॥ जिहींनाहींहरिवोळखीला ॥ २२ ॥

॥ १२ ॥

वोळखीतयाचीहोयएक्याभावे ॥ दुसरीयादेवेनपवी जे ॥ १ ॥ नपवीजेकष्टाउन्मत्तझालीया ॥ दंभतोचिवा यांनागवण ॥ २ ॥ वनवासदेवाकारणेएकांत ॥ करा वींहेव्रततपेयाग ॥ ३ ॥ व्रतेयागयांसीघडलींबहूते ॥ हो तीयासंचितेगौळीयांचीं ॥ ४ ॥ यांसीदैवेंतारियेलेंन

---

१. फळ्लीं असाहि पाठ आहे.

कळतां ॥ मागीलअनंताठावेंहोतें ॥ ५ ॥ होतेंतेंधाव
याआलानारायण ॥ मायबापाऋणगौळीयांचें ॥ ६ ॥
गौळीयांचेंसुखदुर्लभआणिकां ॥ नाहींब्रह्मादिकांतु
काम्हणे ॥ ७ ॥ ॥ १३ ॥
नेणतीयासाठींनेणतालहान ॥ थिंकोनीभोजनमागे
माये ॥ १ ॥ मायादोन्हीयासीबापनारायण ॥ सारीखी
भावनातयांवरी ॥ २ ॥ तयांवरीत्यांचासमचित्तभाव
देवकीवसुदेवनंददोघे ॥ ३ ॥ घेवोनीयांयेकेठाईअव
तार ॥ येकींकेलाथोरवाढवूनी ॥ ४ ॥ उणापुरायासीना
हींकोणाठाव ॥ सारीखाचिदेवअवघीयांसी ॥ ५ ॥ या
सीदोनीठावसारिखेअनंता ॥ आदीलमागुतावाढला
तो ॥ ६ ॥ वाढलातोसेवाभक्तीचीयागूणें ॥ उपचारमि
ष्टान्नेंकरोनीयां ॥ ७ ॥ करोनीसायासेंमेळवीलेंधन ॥
तेंहिकृष्णार्पणकेलेंतींहीं ॥ ८ ॥ कृष्णाशीसकळगाईघो
डेह्मैशी ॥ समर्पिल्यादासीजीवेंभावें ॥ ९ ॥ जीवेंभावें
त्याचीकरितीलसेवा ॥ नविसंबतिनावाक्षणभरी ॥ १०
क्षणभरीहोतांवेगळातयांसी ॥ होतीकासाविसीप्राण
त्यांचे ॥ ११ ॥ त्यांचेध्यानींमनींसर्वभावेंहरि ॥ देहकामक
रीचित्तत्यापें ॥ १२ ॥ त्याचेंचिंचिंतनकृष्णकोठेंगेला ॥ कृ
ष्णहाजेवीलानाहींकृष्ण ॥ १३ ॥ कृष्णआलाघराकृष्ण
गेलादारा ॥ कृष्णहासोयराभेटेकृष्ण ॥ १४ ॥ कृष्णगा
तीओव्यादळणींकांडणीं ॥ कृष्णहाभोजनींपाचारीती
॥ १५ ॥ कृष्णतयाध्यानींआसनींशयनीं ॥ देखतीत्या

स्वप्नींकृष्णरूप ॥ १६ ॥ कृष्णत्यांसिदीसे आभासदुश्चि
ता ॥ धन्यमातापितातुकाम्हणे ॥ १७ ॥ ॥ १४ ॥
कृष्णपरिचारींकृष्णहावेव्हारीं ॥ कृष्णघ्यावोनारीआ
णाम्हणे ॥ १ ॥ ह्मणेकृष्णावीणतुह्माकैसेंगमे ॥ वेळहा
करमेवायांवीण ॥ २ ॥ वायांविणतुह्मीपिटिताचाव
टी ॥ घ्यागेजगजेठीक्षणभरी ॥ ३ ॥ क्षणभरीयाच्यासु
खाचासोहळा ॥ पाहायेकवेळाघेऊनीयां ॥ ४ ॥ याचेंसु
खतुह्मांकळलीयावरी ॥ मगदारोदारीनफिराल ॥ ५ ॥ ल
टिकेंहेंतूह्मावाटेलखेळण ॥ येकाकृष्णाविणअवघेंची
॥ ६ ॥ अवघ्याचतुह्मीटाकालसंगत ॥ घेऊनिअनंत
जालराना ॥ ७ ॥ नावडेहेंतुह्माआणिकबोलीलें ॥ मग
हेंलागलेंकृष्णध्यान ॥ ८ ॥ नकराहामगयाजीवावेग
ळा ॥ टोकवालबाळाआणिकही ॥ ९ ॥ आणिकहीतु
ह्मांयेतीकाकुलती ॥ ज़वळीइच्छितीक्षणबैसो ॥ १० ॥
बैसोचलापाहोंगोपाळाचेंमूख ॥ येकियेकसूखसांग
तील ॥ ११ ॥ सांगेजंवऐसीमातदसवंती ॥ तंवत्याध
रीतीचित्तींबाळा ॥ १२ ॥ बाळायेतीघराघेऊनियांजा
ती ॥ नाहींत्यापरतीतुकाह्मणे ॥ १३ ॥ ॥ १५ ॥
तुकाह्मणेपुन्हानयेतीमागूत्या ॥ कृष्णासीखेळतांदीस
गमे ॥ १ ॥ दिसरातीकांहींनाठवेचित्तासी ॥ पाहतांमु
खासीकृष्णाचिया ॥ २ ॥ याच्यामुखेंनयेडोळियांसी
वीटं ॥ राहिलेहिनीटनटस्थची ॥ ३ ॥ नटस्थराहिलेंसक

(१ येकी पाठ.

ळशरीर ॥ इंद्रियेंव्यापारविसरलीं ॥ ४ ॥ विसरलीं
तानभूकघरदार ॥ नाहींहाविचारअसोंकोठें ॥ ५ ॥ को
ठेंअसोंकोणझालाकाळवेळ ॥ नाठवेसकळविसरल्या
॥ ६ ॥ विसरल्याआह्मीकोणीहिजातीच्या ॥ चहूंहीवर्णां
च्याएकझाल्या ॥ ७ ॥ एकीझाल्यातेव्हांकृष्णाचियासु
खें ॥ निःशंकभातुकेंखेळतील ॥ ८ ॥ खेळतीभातुकेंकृ
ष्णाच्यासहित ॥ नाहींआशंकितचित्तत्यांचें ॥ ९ ॥ चि
त्तींतोगोविंदलटिकेंदळण ॥ करितिहिजाणकरितीतैसे
॥ १० ॥ जनकरितीतैसाखेळतीलखेळ ॥ अवघागो
पाळकरोनीयां ॥ ११ ॥ करोनीआपुलाअवघागोविंद
॥ जनासीचछंदलटिकातो ॥ १२ ॥ त्यांनींकेलाहरि
सासुरमाहेर ॥ बंधुहेकुमरदीरभावें ॥ १३ ॥ भावनारा
हिलीएकाचियाठाईं ॥ तुकाह्मणेपायींगोविंदाच्या ॥
॥ १४ ॥ ॥ १६ ॥

गोविंदभ्रतारगोविंदमूळहरी ॥ नामभेदपरीएकचीं
तो ॥ १ ॥ एकाचींचनामेंठेवियेलींदोनी ॥ कल्पितीलम
नींयावेंजावें ॥ २ ॥ जावेंयावेंतीहींघरीचियाघरीं ॥ ते
थेंचीशीदोरीतेथेंन्यावी ॥ ३ ॥ विचारीतांदीसेयेणेंजा
णेंखोटें ॥ दावितीगोमटेंलोकऐसें ॥ ४ ॥ लोककरोनी
यांसाचवर्ततातीं ॥ तैशायाखेळतीलटिक्याची ॥ ५ ॥
लटिकीकरीतीमंगळदायकें ॥ लटिकेंचियेकयेकाव्या
ही ॥ ६ ॥ व्याहीभाईहरिसोयराजावई ॥ अवघियांचा
ठाईंकेलायेक ॥ ७ ॥ येकासिचपावेजेंकांहींकरीती ॥

उपचारसंपत्तिनानाभोग॥८॥ भोगदेतीसर्वयेकाना
रायणा॥लटिक्याभावनाव्याहीभाई॥९॥लटिकाची
त्यांनींकिलासंवसार॥जाणतिसाचारवेगळात्या॥१०
त्यांणींमृत्तिकेचेंकरोनीअवघे ॥ खेळतीलदोघेपुरुष
नारी॥११॥पुरुषनारीत्यांनींठेवियेलींनावें॥कवतुक
भावेंवीचरती॥१२॥विचरतिजैसेसाचभावेंलोक॥
तैसेंनाहींसुखखेळतीत्या॥१३॥ त्यांनीजाणीतलेंआ
पआपणीयां॥ लटिकेंहेंवांयांखेळतोते॥१४॥ खेळ
तोतेआह्मीनव्होंनारीनर॥ह्मणोनीविकारनाहींतया॥
॥१५॥ तयाठावेंआहेआह्मीअवघेयेक ॥ ह्मणोनी
निःशंकखेळतील॥१६॥तयाठावेंनाहींहरिचियागुणें
आह्मीकोणकोणकायखेळों॥१७॥कायखातोंआह्मी
कासयासांगातें॥कैसेंहेंलागतेंनेणोंमुखीं॥१८॥मुखीं
चवीनाहींतवरीअंगींलाज॥ वर्णयातिकाजंनधरीती
॥१९॥नधरीतीकांहींसंकोचत्यामना॥हांसतांयाज
नानायीकती॥२०॥ नायिकतीबोलआणिकांचेका
नीं॥हरिध्यानींमनींबैसलासे॥२१॥बैसलासेहरिज
यांचियेचित्तीं॥तयांनावडतीमायबापें॥२२॥मायबा
पेंत्यांचिनेतिपाचारूनी॥बळेंपरिमनींहरिवसे॥२३॥
वसतिलबाळाआपुलाल्याघरीं ॥ ध्यानत्याअंतरींगो
विंदाचें॥२४॥ गोविंदाचेंध्याननिजलियाजाग्या॥
आणिकवावुग्यानबोलती॥२५॥ नबोलतिनीजलि
याहरिविण॥जागृतिस्वपनएकझालें॥२६॥एकविध

सुखघेतीलत्याबाळा ॥ भ्रमरपरिमळालागींजैसा ॥
॥ २७॥ तैसात्यांचाभावघेतलात्यापरी ॥तुकाह्मणेहरि
बाळलीळा॥ २८ ॥ ॥ १७॥
लीळाविग्रहीतोलेववीखाववी ॥ यशोदाबैसवीमांडी
वरि॥ १ ॥ मांडीवरिभारपुष्पाचीयापरी ॥ बैसोनियां
करीस्तनपान॥ २ ॥ नभाचाहिसाक्षीपाताळापरता॥
कुर्वाळितेमाताहातेंत्यासी॥ ३॥ हातेंकुर्वाळोनीमुखीं
घालीग्रास॥पुरेह्मणतोतीसपोटधालें॥४॥ पोटधालेंम
गदेतसेंढेंकर॥ भक्तीचेंतेंफारतुळसीदळ ॥ ५॥ तुळसी
दळभावेंसहितदेवापाणी॥फारतेंत्याहूनीक्षीरसिंधु॥६
क्षीरीचाकंटाळाअसेयेकवेळा ॥ भक्तीचेंतेंजळगोड
देवा॥७॥ देवाभक्तजीवाहूनीआवडती॥ सकळहिप्री
तित्यांचेठाईं ॥ ८ ॥ त्याचाहाअंकितसर्वभावेंहरी॥ तु
काह्मणेकरीसर्वकाज॥ ९॥ ॥ १८॥
जियेवेळींनेलींचोरोनियांवत्सें ॥ तयांलागींतैसेंहोणें
लागे॥ १॥लागेदोहींठाईंकरावेंपाळण॥ जगाचाजीव
नमायबाप॥ २॥मायझालाहरीअवघ्यावत्सांची॥घरीं
वत्सेंजीचींतैसाझाला॥ ३॥ झालाजैसातैसाघरींचेगो
पाळ॥आणिकसकळमोहरिपांवे॥४॥ मोहरिपांवेसिं
गेंवाहिल्याकाहाळा॥ देखिलासोंहळाब्रह्मादीकीं॥५॥
ब्रह्मादिकांसुखस्वप्नींतेंहिनाहीं॥ तैसेंदोहींठाईंवोसंडलें
॥६॥वोसंडल्याक्षीरअमूपत्यागाई॥ जैसीज्याचीआ
ईतैसाझाला ॥७॥ लाघवकळलेंब्रह्मादिकांयाचें॥ प

रब्रह्मसाचें अवतरलें ॥ ८ ॥ तरले हे जन सकळहि आतां ऐसा तो विधाता बोलियेला ॥ ९ ॥ लागला हे स्तुति करूं अनंताची ॥ चतुर्मुखें वाची भक्तीस्तोत्रें ॥ १० ॥ भक्तकाजा देवें केला अवतार ॥ पृथिवीचा भार फेडावया ॥ ११ ॥ पृथिवी दाटली होती या असुरीं ॥ नसाहवे वरी भार तये ॥ ॥ १२ ॥ तया काकुळती आपुल्या दासांची ॥ तयालागीं वेची सर्वस्वही ॥ १३ ॥ स्वहित दासाचें करावयालागीं ॥ अव्यक्त हें जगीं व्यक्त आलें ॥ १४ ॥ लेखा कोण करील त्यां चिया पुण्याचा ॥ जयांस वेंवाचा बोले हरि ॥ १५ ॥ हरि नाममात्रें पातकाची रासी ॥ तो आला घरासी गौळीयांच्या ॥ १६ ॥ गौळिये अवघी झालीं कृष्णमय ॥ नामें लोकत्रय तरतील ॥ १७ ॥ तरतील नामें कृष्णाचिया दोषी ॥ बहूत ज्यापासीं होय पाप ॥ १८ ॥ पाप ऐसें नाहीं कृष्णनामें राहे ॥ धन्य तोचि पाहे कृष्णमूख ॥ १९ ॥ मुखमाझें काय जो मी वर्णूं पार ॥ मग नमस्कार घाली ब्रह्मा ॥ ॥ २० ॥ ब्रह्मा नमस्कार घाली गोधनासी ॥ कळला तयासी हा ची देव ॥ २१ ॥ देवचि अवघा झाला से सकळ ॥ गाई हा गोपाळ वत्स तेथें ॥ २२ ॥ तेथें जें पाहणें आणिक दुसरें ॥ मूर्खत्या नंतरें दुजें नाहीं ॥ २३ ॥ दुजा भाव तुका ह्मणे जया चित्ती ॥ रवंरव भोगिति कुंभपाक ॥ २४ ॥ १९ ॥ कुंभीपाक लागे तयासि भोगणें ॥ अवघाचि नेणें देव ऐसा ॥ १ ॥ देव ऐसा ठावा नाहीं जया जना ॥ तयासि यात

(१) या नावांचे नरक,

नायमकरी ॥ २ ॥ कळलाहादेवतयासिचखरा ॥ गाईव
त्सेंघराधाडीब्रह्मा ॥ ३ ॥ ब्रह्मादिकांदेवऐसाअगोचर ॥
कैसात्याचापारजाणवेल ॥ ४ ॥ जाणवलादेवगौळी
यांच्याभावें ॥ तुकाह्मणेव्हावेंसंचितहें ॥ ५ ॥ ॥ २० ॥
संचितउत्तमभूमीकसुनीयां ॥ जाऊंनेदींवायांपरीत्यां
चें ॥ १ ॥ त्यांचियापिकासीआलियाघुमरी ॥ आल्या
गाईवरीआणिगाई ॥ २ ॥ गाईदवडुनीयांघालीतीबा
हेरी ॥ तंवह्मणेहरिबांधात्यांसी ॥ ३ ॥ त्याहितुह्मीबांधा
तुमच्यासारीख्या ॥ भोवांडापारिख्यावाड्यांतूनी ॥ ४ ॥
पारिख्यानयेतीकोणाचियाघरा ॥ सूत्रधारीखरानारा
यण ॥ ५ ॥ नारायणनांदेजयाचियेठाईं ॥ सहजतेथे
नाहींघालमेली ॥ ६ ॥ मेलीहिशाहाणीकरितांसाया
स ॥ नाहींसुखलेशतुकाह्मणे ॥ ७ ॥ ॥ २१ ॥
तुकाह्मणेसुखघेतलेंगोपाळीं ॥ नाचतीकांबळीकरु
नीध्वजा ॥ १ ॥ करोनियांटीरीआपुलेमांदळ ॥ वाज
वितीटाळदगडाचे ॥ २ ॥ दगडाचेटाळकोणत्यांचाना
द ॥ गीतीगातांछंदतालनाहीं ॥ ३ ॥ तालनाहींगातां
नाचतांगोपाळां ॥ घननीळसांवळाजयांमध्यें ॥ ४ ॥
जयामध्येंहरितेंसुखआगळें ॥ देहभावकाळनाहींत
यां ॥ ५ ॥ तयांसिआळंगीआपुलियाकरीं ॥ जातीं
भूमीवरीलोटांगणी ॥ ६ ॥ निजभावदेखेजयांचियेअं
गीं ॥ तुकाह्मणेसंगीक्रीडेतया ॥ ७ ॥ ॥ २२ ॥

तयांसवेंकरीकालादहींभात ॥ शिदोऱ्याअनंतमेळवू
नि ॥ १॥ मिळवूनिअवघियांचेयेकेठाई ॥ मागेंपुढें
काहींउरोंनेदी ॥ २ ॥ नेदीचोरीकरूंजाणेअंतरींचें ॥
आपुलेंहिसाचेंघावेंतेथें ॥ ३ ॥ घावादहींभातआपु
ल्याप्रकारें ॥ तयाचावेव्हारसांडवावा ॥ ४ ॥ वांटीस
कळांसीहातेंआपुलीया ॥ जैसेंमागेतयातैसेंघावें ॥
॥ ५ ॥ घावेंसांभाळोनीसमतुकभावें ॥ आपणहिखा
वेंत्याचेंतुकें ॥ ६ ॥ तुकेंसकळांचींगोविंदाचेहातीं ॥
कोणकोणगतिभलाबुरा ॥ ७ ॥ राखेत्यासतैसाआपु
लाल्याभावें ॥ विचारोनिघावेंजैसेंतैसें ॥ ८ ॥ तैसेंसु
खनाहींवैकुंठींच्यालोकां ॥ तेंदिल्हेंभावीकांगोपाळां
सी ॥ ९ ॥ गोपाळांच्यामुखींदेवूनीकवळ ॥ घासमाखे
लाळखायेत्यांची ॥ १० ॥ त्यांचीयामुखींचाहिरोनि
यांघांस ॥ झोंबोनीहातासखायेबळें ॥ ११ ॥ बळें
जयाचीयाठेंगणेंसकळ ॥ तयातेंगोपाळपाडीताती ॥
॥ १२ ॥ पाठीऊचलोनीवाहातीलखांदी ॥ नाचतील
मांदीमेळवूनि ॥ १३ ॥ मांदीमेळवूनीधनदिलेंआह्मा ॥
तुकाह्मणेजमाकेल्यागाई ॥ ॥ १४ ॥ ॥ २३ ॥
केलापुढेंहरिअस्तमानदिसे ॥ मागेंत्यासरिसेथाटचा
ले ॥ १ ॥ थाटचालेगाईगोपाळांचीधूम ॥ पुढेंकृष्ण
रामतयांसोई ॥ २ ॥ सोईलागलीयातयाचियेअंतीं ॥
बोलावितांयेतीमागेंतया ॥ ३ ॥ तयांचियेचित्तींबैस
लाअनंत ॥ घेतीनित्यानित्यतेंचिसुख ॥ ४ ॥ सुखना

हींकोणाहरीच्यावियोगें ॥ तुकाह्मणेयुगेंघडीजाय॥
॥५॥ ॥ २४ ॥
जायफांकोनीयांदवडोनिगाई॥ आपुल्याचसोईचीये
घरां॥१॥घराचीयेसोईअंतरलादेव॥गोपाळाचाजीव
गोविंदापें॥२॥गोविंदेंवेधीलेंतुकाह्मणेमन॥वियोग
हिध्यानसंयोगाचें॥३॥ ॥२५॥
वियोगसकळांअसेसर्वकाळ ॥ दुश्चितागोपाळआ
लादिसे ॥ १ ॥ गोपाळगुणाचाह्मणेगुणमये ॥ निंब
लोणमायेउतरीलें ॥ २ ॥ उतरोनिहातींधरिलाहनुव
टी॥ ओवाळोनिदिठीसांडीयेली ॥ ३ ॥ दिठिंघालीमा
ताविश्वाच्याजनका ॥ भक्तिचीयासुखागोडावला॥
॥४॥लहानहाथोरजीवजंतभूतें॥आपणदैवतेंझालादे
व॥५॥देवीह्मैसासुरमुंजियाखेचर॥सानआणिथो
रदेवहरि ॥ ६ ॥ तुकाह्मणेहरिअवघायेकला ॥ परिहा
धाकुलाभक्तीसाठीं॥७॥ ॥२६॥
भक्तीसाठींकरीयशोदेसिआळी ॥ थिंकोनियांचोळी
डोळेदेव ॥ १ ॥ देवेंगिळूनीयांधरिलेंमोहन ॥ मायह्म
णेकोणयेथेंदुजा ॥ २ ॥ दुजेंयेथकोणीनाहींकृष्णावी
ण॥ निरुतेजाणोनपुसेदेवा ॥ ३ ॥ देवापासींपुसेदेव
कायझाला॥हांसेंआलेंबोलायाचेहरि ॥ ४ ॥ याचेमी
जवळीदेवतोनेणती॥लटिकेंमानितीसाचखरें ॥ ५ ॥
लटिकेंतेंसाचसाचतेंलटिकें ॥ नेणतिलोभिकेआशा
बद्ध॥६॥सांगह्मणेमायेयेरुवाशीतोंड॥तंवतेंब्रह्मांड

(१) दृष्टि.

देखेमाजि ॥ ७ ॥ जयामाजिचंद्रसूर्यतारांगणें ॥ तो
भक्तांआधीनबाळलीळा ॥८ ॥ लीळाकोणजाणेयाचें
महिमान ॥ जगाचेंजीवनदेवादेव ॥ ९ ॥ देवेंकवतु
कदाखविलेंतया ॥ लागतीलपायांमायबाप ॥ १० ॥
मायबापह्मणेहाचिदेवखरा ॥ आणिकपसारालटिका
तो ॥ ११ ॥ तोहित्याचादेवदिलानारायणें ॥ माझाहि
कारणतोहिमीच ॥ १२ ॥ मीचह्मणोनीयांजेथेंजेजे
ध्याती ॥ तेथेंमीश्रीपतिभोगिताहें ॥ १३ ॥ तेमजवेग
ळेमीतयांनिराळा ॥ नाहींयासकळाब्रह्मांडांत ॥ १४ ॥
तद्भावनाइच्छाजैसाभावत्याचा ॥ फळदेतासाचामी
चियेक ॥ १५ ॥ मीचियेकखराबोलेनारायण ॥ दावीलें
निर्वाणनिजदासां ॥ १६ ॥ निजदासांखूणदाविली
नीरुति ॥ तुकाह्मणेभूतींनारायण ॥ १७ ॥ ॥ २७ ॥
नारायणभूतींनकळेजयासी ॥ तयागर्भवासींयेणेंजा
णें ॥ १ ॥ येणेंजाणेंहोयभूतांच्यामत्सरें ॥ नकळतांखरें
देवऐसा ॥ २ ॥ देवऐसाजयाकळलासकळ ॥ गेलीत
ळमळदेहबुद्धि ॥ ३ ॥ बुद्धीचापालटनव्हेकदाकाळीं ॥
हरिजळींस्थळींजयाचित्तीं ॥ ४ ॥ चित्ततेंनिर्मळजैसें
नवनीत ॥ जाणिजेअनंततयामाजी ॥ ५ ॥ तयामाजी
हरिजाणीजेत्याभावें ॥ आपुलेंपरावेंसारीखेंचि ॥ ६ ॥
चिंतनेंजयाच्यातरतीआणिक ॥ जोहेंसकळीकदेवदे
खे ॥ ७ ॥ देवदेखेतोहिदेवकैसानव्हे ॥ उरलासंदेहका
यत्यासी ॥ ८ ॥ कायावाचामनेंपुजावेवैष्णव ॥ मनीं

शुद्धभावधरोनियां ॥ ९ ॥ तयासिकवतूकदाखविलें
रानीं ॥ वोणवागीळोनीगोपाळांसी ॥ १० ॥ गोपाळां
चेडोळेझांकविलेहातें ॥ धरिलेंअनंतेंविश्वरूप ॥ ११ ॥
पसरोनिमुखगिळीयेलीज्वाळ ॥ पाहातीगोपाळबोटा
सांदी ॥ १२ ॥ संदीसारोनीयांपाहिलेंअनंता ॥ ह्मण
तिलआतांकळलासी ॥ १३ ॥ कळलाहातुझादेहनव्हेदे
वा ॥ गिळिलावोणवाआणिकतो ॥ १४ ॥ तोतयांक
ळलाओंरुषगोपाळा ॥ दुर्गमसकळांसाधनासी ॥ १५
तुकाह्मणेशिणऊंरेसाधनाचा ॥ भावीकासिसाचाभा
वदावी ॥ १६ ॥ ॥ २८ ॥

भावदावीशुद्धदेखोनियांचित्ता ॥ आपुल्याअंकितानि
जदासा ॥ १ ॥ सांगेगोपाळांसिकायपुण्यहोतें ॥ वांचलो
जळतांअग्निहातीं ॥ २ ॥ आजीआह्मायेथेंवांचविलेंदे
वें ॥ नाहींतरिजीवेंनवांचतों ॥ ३ ॥ नवांचत्यागाईज
ळतोंसकळें ॥ पूर्वपुण्यबळेंवांचविलें ॥ ४ ॥ पूर्वपुण्यहो
तेंतुमचीयागांठी ॥ बोलेजगजेठीगोपाळांसी ॥ ५ ॥ गो
पाळांसिह्मणेवैकुंठनायक ॥ भलेतुह्मीएकपुण्यवंत ॥
॥ ६ ॥ करीतुकाह्मणेकरवीआपण ॥ द्यावेंथोरपणशे
वकांसी ॥ ७ ॥ ॥ २९ ॥

कायआह्माचाळविसिवायांवीण ॥ ह्मणतिदुरूनदेखि
लासि ॥ १ ॥ लावोनियांडोळेनव्हतोंदुश्चित्त ॥ तुजपरि
चित्तमावहोती ॥ २ ॥ होतीदृष्टिआतांउघडिआमुची ॥

(१) आर्ष.

बाहेरतेवांचीकुंचीझांकी॥३॥झालासीथोरलाथोरल्या
तोंडाचा॥गिळियेलीवाचाधूरआगीं॥४॥ अग्निखातो
ऐसाआमुचासांगाती॥आनंदेंनाचतीभोवताले॥५॥
भोवतीआपणमेळविलेंदेवें ॥ तुकाह्मणेव्हावेंनाहीं
ज्ञान॥६॥ ॥३०॥

नाहींत्याचीशंकावैकुंठनायका॥ नेणतीतेयेकावीणदु
जे॥१॥जाणतीयासवेंयेवोंनेदीहरि ॥ तर्कवादीदूरी
दुराविले॥ २ ॥वादयांसीभेदनिंदाअहंकार॥देऊनि
यांदूरदूराविले॥ ३ ॥दुराविलेदूरआशाबद्धदेवा॥क
रितांयासेवाकुटुंबाची ॥ ४ ॥ चित्तींद्रव्यदारापुत्रादि
संपत्ती ॥ समानतेहोतीपशुनर॥ ५ ॥ नरकसाधिला
विसरोनिदेवा ॥ बुडालेतेभवानदिमाजी ॥ ६ ॥ जि
हींहरीसंगेकेलासंवसारीं ॥ तुकाह्मणेखरीत्याचीखेप
॥७॥ ॥३१॥

खेळिमेळिआलेघरागोपीनाथ॥ गोपाळांसहितमाते
पाशीं॥ १ ॥ मातेपाशींएकनवलसांगती ॥ झालीतै
सिख्यातीवोणव्याची॥२॥वोवाळीलेंतीणेंकरोनीआ
रती ॥पुसेदसवंतीगोपाळांसी ॥ ३ ॥पुसेपरतोनीमा
गुतामागुती॥ गोपाळसांगतीकवतुक॥४ ॥कवतुक
कानींआईकतांत्यांचें॥बोलतांयेवाचेवीटनये ॥ ५॥
नयनगुंतलेश्रीमुखपाहातां ॥ नसाहेलवतांआडपातें
॥ ६ ॥ तेव्हांकवतुककळोंआलेंकांहीं ॥हळुहळूदोहीं
मायबापा॥७॥हळुहळूत्यांचेंपुण्यझालेंवाड॥वारलेंहें

झाडतिमिंराचें ॥ ८ ॥ तिमिरहेंतेथेंराहोंशकेकैसें ॥ झा
लीयाप्रकाशेंगोविंदाच्या ॥ ९ ॥ दावीतुकाह्मणेदेवज्या-
आपणा ॥ पालटतोक्षणामाजीयेका ॥ १० ॥ ॥ ३२ ॥
कायआतांयासीह्मणावेंलेंकरूं ॥ जगाचाहागुरुमाय
बाप ॥ १ ॥ मायायाचीयासीराहिलीलपोन ॥ कळों
नयेक्षणएकहोतां ॥ २ ॥ क्षणयेकहोतांविसरलात्यां
सी ॥ माझेंमाझेंऐसेंकरीबाळा ॥ ३ ॥ करोनीकौतुकक
ळोंनेदीकोणा ॥ योजोनीकारणातोचीखेळे ॥ ४ ॥
तेंसुखलुटीलेंघरीचीयाघरीं ॥ तुकाह्मणेपरीआपुला
ल्या ॥ ५ ॥ ॥ ३३ ॥
आपुलालेपरीकरीतीलसेवा ॥ गीतगातीदेवाखेळवू
नी ॥ १ ॥ खेळमांडियेलायमुनेपावळी ॥ यावेंचेंडूफळी
खेळुंआतां ॥ २ ॥ आणविल्याडांगाचौगुणातुकांठी ॥
बैसूनियांवांटीगडियांसी ॥ ३ ॥ गडीजंवपाहेआपणा
समान ॥ नाहींनारायणह्मणेदूजा ॥ ४ ॥ जाणोनीगोविं
दसकळांचाभाव ॥ तयासीउपावतोचिसांगे ॥ ५ ॥ सां
गेसकळांसीव्हारेयेकेठाई ॥ चेंडूराखाभाईतुह्मीमाझा
॥ ६ ॥ मजहानलगेआणिकसांगाती ॥ राखावीबहुतीं
हाकमाझी ॥ ७ ॥ माझेहांकेहांकमेळवासकळ ॥ नवजा
बरळयेकायेक ॥ ८ ॥ येकासमतुकेअवघेचीराहा ॥ जा
ईलतोपाहाधराचेंडू ॥ ९ ॥ चेंडूधराऐसेंसांगतोंसकळां ॥
आपणनिराळायेकलाची ॥ १० ॥ चिंतूनियांचेंडूहा

---

(१) अंधार.

णीऊर्ध्वमूखें ॥ ठेलींसकळिकपाहातची ॥ ११ ॥ पाहा
तचिठेलेनचलतांकांहीं ॥ येरुलवलाहीह्मणेधरा ॥ १२ ॥
धरावातयानीत्याचेंबळत्यासी ॥ येराआणिकासीला
गनङ्के ॥ १३ ॥ नङ्केबळबुद्धिकामनङ्केत्यांचें ॥ नधरवे
नीचउंचवीणें ॥ १४ ॥ विचारीपडीलेदेखोनिगोपाळ
याह्मणेसकळमाझेमागें ॥ १५ ॥ मार्गदेवावीणनदि
सेआणिका ॥ चतुरहोतकांबहुतजन ॥ १६ ॥ चतुरचिं
तीतीबहुतमारग ॥ हरिजायमागपाहोनीयां ॥ १७ ॥
तयामार्गेआलेगोविंदगोपाळ ॥ तेनेलीसीतळपंथठा
या ॥ १८ ॥ पंथतेचूकलेआपुलेमवीचे ॥ तयांमागेंत्यांचें
तेचीहाल ॥ १९ ॥ हालदोघांयेकामोहरेमागीला ॥ चा
लतांचुकलावाटपंथ ॥ २० ॥ पंथपुढिल्यासीचालतां
नकळे ॥ मागील्यानीडोळेउघडावे ॥ २१ ॥ वयाच्या
प्रबोधेंविचारज्यानाही ॥ समानतोदेहीबाळकासी ॥
॥ २२ ॥ सिकविलेंहितनायीकेजोकानीं ॥ त्यामागेंभ
ल्यांनींजाऊंनये ॥ २३ ॥ नयेतेंचिकरीश्रेष्ठाचीयाम
ना ॥ मूर्खयेकजाणातोचीखरा ॥ २४ ॥ रानभरीझाले
नकळेमारग ॥ मगतोश्रीरंगआठवीला ॥ २५ ॥ लाज
सांडोनियांमारितीलहांका ॥ कळलेंनायकावैकुंठींच्या
॥ २६ ॥ चारीवेदज्याचीकीर्तिवाखाणीति ॥ तयाअति
प्रीतिगोपाळांची ॥ २७ ॥ गोपाळांचाधांवाआयकी
लाकानीं ॥ सोयीचक्रपाणीपाववीले ॥ २८ ॥ सोयध
रोनीयांआलेहरिपाशीं ॥ लहानथोरांसीसांभाळीलें ॥

॥ २९ ॥ सांभाळिलें तुका ह्मणे सकळहि ॥ सुखे झाले तेही हरिमुखें ॥ ३० ॥ ॥ ३४ ॥

मुखे सांगे त्याशीं पैल चेंडू पाहा ॥ उदकांत डोहाचीया मांथा ॥ १ ॥ माथा कळंबाचे अवघडा ठाईं ॥ दावियेला डोहीं जळामाजी ॥ २ ॥ जळांत पाहाती हे डतियेदृष्टी ॥ ह्मणे जगजेठी ऐसें नव्हे ॥ ३ ॥ नव्हे साच चेंडू छाया दिसे आंत ॥ खरें तें थें चित्त लावा वरी ॥ ४ ॥ वरि अवघियांनी देखियेला डोळां ॥ ह्मणति गोपाळा आतां कैसें ॥ ५ ॥ कैसें करोनीयां उतरावा खालीं ॥ देखोनीयां भ्याली अवघी डोहो ॥ ६ ॥ डोहो बहु खोल काळीया भीतरी ॥ सरलीं माघारीं आवघीं जणें ॥ ७ ॥ जयासी कारण तयासी च ठावें ॥ पुसे त्याच्या भावें त्यांस हरि ॥ ८ ॥ त्यासि नारायण ह्मणे राहा तळीं ॥ चढे वनमाळी झाडावरी ॥ ९ ॥ वरि जातां हरि पाहाती सकळ ॥ ह्मणति गोपाळ आह्मी नेणो ॥ १० ॥ नेणो ह्मणती हे करितोसि काई ॥ आह्मां तुझी आई देईल शीव्या ॥ ११ ॥ आपुलिया काना ठवूनीयां हात ॥ सकळीं निमित्त टाळीयेलें ॥ १२ ॥ निमित्ताकारणें रचिलें कारण ॥ गेला नारायण खांदीवरी ॥ १३ ॥ खांदीवरी पाय ठवियेला देवें ॥ पाडावा त्या भावें चेंडू तळीं ॥ १४ ॥ तळिं ल नेणती तुका ह्मणे भावें ॥ अंतरींचें देव कळों नेदी ॥ १५ ॥ ॥ ३५ ॥

---

(१) आणती. (२) खालचे.

नदीकळोंकेल्याविणतेंकारण ॥ दाखवीआणूनअनु
भवा ॥ १ ॥ नपूरेसाहातघालीचेंडूकडे ॥ ह्मणतीलगडे
सांभाळावें ॥ २ ॥ सांभाळकरीतासकळजीवाचा ॥
गोपाळांसीवाचाह्मणेवरें ॥ ३ ॥ वरेंविच्यारोनीकरावें
कारण ॥ ह्मणेनारायणबऱ्यावरें ॥ ४ ॥ वरेंह्मणोनीयां
तयाकडेपाहे ॥ सोडवीलाजायेचेंडूतळा ॥ ५ ॥ तयास
वेंउडीघातलीअनंतें ॥ गोपाळरडतयेतीघरा ॥ ६ ॥ ये
तांत्यांचालोकींदेखिलाकोल्हाळ ॥ सामोरींसकळआ
लींपुढें ॥ ७ ॥ पुसतितेमाततयागोपाळांसी ॥ हरिदुःखें
त्यांसीनबोलवे ॥ ८ ॥ नबोलवेहरिबुडालासेमुखें ॥ कु
ठतीलदुःखेंऊरमाथे ॥ ९ ॥ मायबापतुकाह्मणेनदेख
ती ॥ तैसेंदुःखचित्तींगोपाळांच्या ॥ १० ॥ ॥ ३६ ॥
गोपाळांउभडूनावरेंदुःखाचा ॥ कुंठितहेवाचाझाली
त्यांची ॥ १ ॥ झालेंकायऐसेंनकळेकोणासी ॥ ह्मण
तितुह्मापासीदेवहोता ॥ २ ॥ देवासवेंदुःखनपावति
ऐसें ॥ काहींअनारिसेदीसेआजी ॥ ३ ॥ आजिदिसे
हरिफाकलायापाशीं ॥ ह्मणऊनीऐसीपरिझाली ॥ ४ ॥
जाणविल्यावीणकैसेंकळेयांसी ॥ शाहणेतयांसीक
ळोंआलें ॥ ५ ॥ कळोंआलेंतीहींस्फुंदशांतकेला ॥ ठाईं
चाचित्यांलाथोडाहोता ॥ ६ ॥ होतातोविचारसांगीत
लाजना ॥ गोपाळशाहाणाहोतात्याणें ॥ ७ ॥ सांगेआ
तांहरितुह्मांआह्मांनाहीं ॥ बुडालासेडोहींयमुनेच्या ॥
॥ ८ ॥ यांसिअवकाशनक्केचिपुसतां ॥ झालीयाअनं

ताकोणपरि ॥ ९ ॥ परित्यादुःखाचीकायसांगोंगाथा ॥
तुकाह्मणेमातातोकपाळा ॥ १० ॥ ॥ ३७ ॥
पाषाणफुटतितेंदुःखकरोनी ॥ करितांगौळणीशोक
लोकां ॥ १ ॥ कायऐसेंपापहोतेंआह्मांपाशीं ॥ बोल
तियेकासीयेकयेकां ॥ २ ॥ येकाचीयाडोळांअश्रुबा
त्याल्कारीं ॥ नाहींतीअंतरींजळतील ॥ ३ ॥ जळतितीं
येकेअंतर्बात्याल्कारीं ॥ ठाकीलींलेंकूरेंकडियेहूनी ॥ ४ ॥
निवांतचियेकेराहातिनिश्चित ॥ बाहेरनाआंतजीवत्यां
चे ॥ ५ ॥ त्यांचेजीवावरीआलेत्यासकळा ॥ येकात्या
गोपाळावांचूनियां ॥ ६ ॥ वांचणेंतेंखोटेंआतांयासं
सारीं ॥ नव्हेभेटीजरीहरीसवें ॥ ७ ॥ सवेंघेऊनीयांचा
लिलेगोपाळ ॥ आवघींचबाळनरनारी ॥ ८ ॥ नरनारी
नाहींमनुष्याचेंनाव ॥ गोकुळहेंगांवसोडीयेलें ॥ ९ ॥
सोडियेलींअन्नेंसंपदासकळ ॥ चित्तींतोगोपाळधरु
नीजाती ॥ १० ॥ तीरींमानाघालोनियांउभ्यागाई ॥
तटस्थत्याडोहींयमुनेच्या ॥ ११ ॥ यमुनेच्यातीरींझाडें
वृक्षवल्ली ॥ दुःखेंकोमाईलींकृष्णाचीया ॥ १२ ॥ या
चेंत्याचेंदुःखयेकझालेंतीरीं ॥ मगशोककरीमायबाप
॥ १३ ॥ मायबापतुकाह्मणेसहोदर ॥ तोंवरीचतीरन
पावती ॥ १४ ॥ ॥ ३८ ॥
तीरींदेखोनीयांयमुनेचेंजळ ॥ कांठींचकोल्हाळकरी
ताती ॥ १ ॥ कईवाडनव्हेघालावबाउडी ॥ आपणांसि
बोढीभयमागें ॥ २ ॥ मागेंसरेंमायपाउलांपाऊली ॥

आपुलेचिघालीधाकेंआंग ॥ ३ ॥ आंगराखोनीयां
मायखेदकरी॥ अंतरीहेंहरिजाणवलें ॥ ४ ॥ जाणवलें
मगदेवेंदिल्हीबुडी॥ तुकाह्मणेकुडीभावनाहे॥५॥३९॥
भावनेच्यामुळेंअंतरलादेव॥ शीरलासंदेहभयपोटीं॥
॥ १ ॥ पोटींहोतेंमागेंजीवद्यावाऐसें ॥ बोलील्यासरि
सेंनकरवे॥ २॥ नकरवेत्यागजीवाचायानाश॥ नारा
यणत्यासअंतरला॥३॥ अंतरलाबहुबोलतांवाऊगें॥
अंतरींच्यात्यागेवीणगोष्टी ॥ ४ ॥ गोष्टीसकळांच्याअ
यिकील्यादेवें ॥ कोणकोणाभावेंरडताती॥ ५ ॥ तींगे
लींघरासीआपुल्यासकळ ॥ गोधनेंगोपाळलोकमा
य ॥ ६ ॥ मायबापाचीतोऐसीझालीगति॥ तुकाह्मणे
अंतींकळोंआलें॥ ७॥ ॥ ४० ॥
आलायाचाभावदेवाचीयामना ॥ अंतरींकरुणासा
ठींहोतां॥ १ ॥ होतांभावत्याचापाहोनीनिराळा॥ नव्ह
तांपाताळागेलाआधीं ॥ २॥ आधींपाठीमोरींझाली
तींसकळें ॥ मगयागोपाळेंबुडीदीली॥ ३ ॥ दिलीहांक
त्यानेंजाऊनीपाताळा ॥ जागविलेंकाळाभुजंगासी
॥ ४ ॥ भुजंगहाहोतानिजेलामंदीरीं ॥ निर्भयअंतरीं
गर्वनीधी ॥ ५ ॥ गर्वहरावयाआलानारायण॥ मीस
याकरोनचेंडूवाचें ॥ ६ ॥ चेंडुवाचेमीसेंकाळियाना
थावा॥ तुकाह्मणेदेवाकारणहें॥ ७॥ ॥ ४१ ॥
काळयाचेंमागेंचेंडूफ़ळीपाशीं॥ तेजःपुंजराशीदेखिये
ला ॥ १ ॥ लावण्यपूतळामुखप्रभाराशी ॥ कोटीरवि

शशीउगवला ॥ २ ॥ उगवलाखांबकर्दळीचागाभा ॥
ब्रीदेंवांकीनभादेखेपायीं ॥ ३ ॥ पाहिलासकळतिणें
न्याहाळोनी ॥ कोणयाजननीप्रसवली ॥ ४ ॥ विस
रुहातीसींकैसायाघ्याझाला ॥ जिवाहुनिवाहिलादिस
तसे ॥ ५ ॥ दिसतसेरूपगोजिरेंलहान ॥ पाहातांलोच
नसुखावले ॥ ६ ॥ काळपरतोनीपाहेदुष्टाकडे ॥ म
गह्मणेकुडेंझालेंआतां ॥ ७ ॥ आतांउठोनीयांखाईल
याबाळा ॥ देईलवेल्हाळामायजीव ॥ ८ ॥ जीवया
चाकैसावांचेह्मणेनारि ॥ मोहिलीअंतरींहरिरूपें ॥ ९ ॥
रूपेंअनंताचींअनंतअपार ॥ नकळेसाचारतुकाह्मणे
॥ १० ॥ ॥ ४२ ॥
ह्मणेचेंडुकोणेंआणीलायाठायां ॥ आलोंपुरवावया
कोडत्याचें ॥ १ ॥ त्याचेंअयीकोनीनिष्ठुरवचन ॥ भ
याभीतमनझालेंतीचें ॥ २ ॥ तिचीचित्तवृत्तिहोतीदे
वावरी ॥ आदीतेमाघारीफिरेवेगीं ॥ ३ ॥ वेगींमनगे
लेंअतारासेसोयीं ॥ विघ्नआलेंकांहींअह्मांवरी ॥ ४ ॥
वरिउदकासीनाहींअंतपार ॥ अक्षयसागरभरलासे ॥
॥ ५ ॥ संचारकरोनीकोण्यावाटेआला ॥ ठांईचदेखी
लाअवचिता ॥ ६ ॥ अवचितानेणोंयेथेंऊगवला ॥
दिसतोधाकुलाबोलमोठे ॥ ७ ॥ मोठ्यानेंबोलेभयना
हींमनीं ॥ केलेंऊठवूनीबाळजागा ॥ ८ ॥ जागविलें
काळासर्पातयेवेळीं ॥ उठल्याकल्लोळीविषाचीया ॥
॥ ९ ॥ यमुनेच्याडोहावरीआलाऊत ॥ कालियाकृतां

तधुधुःकारें ॥ १० ॥ कारणेंज्यायेथेंआलानारायण ॥
झालेंदरुशनदोघामध्यें ॥ ११ ॥ दोघांमध्येंझालेबोल
परस्परें ॥ प्रसंगउत्तरेंयुद्धाचीया ॥ १२ ॥ चिंतावला
चित्तींतोंडेंबोलेकाळ ॥ करीनसकळग्रासतूझा ॥ १३ ॥
झालासावकाशझेपघालीवरी ॥ तंवहाणीहरिमुष्टिघा
तें ॥ १४ ॥ नेणोकाळत्यासीदिसेकाळतैसा ॥ हरावया
जैसाजीवआला ॥ १५ ॥ आठवलेंकाळहाकारिलेंगो
त ॥ मिळालींबहुतनागकुळें ॥ १६ ॥ कल्हारीसंधानी
वेष्टियेलाहरि ॥ अवघाविखारींव्यापियेला ॥ १७ ॥
यासीतुकाह्मणेनाहींभक्तावीण ॥ खगाचेंचिंतनकेलें
मनीं ॥ १८ ॥ ॥ ४३ ॥
निजदासउभातत्काळपायापें ॥ स्वामीदेखेसर्पेंवेष्टिये
ला ॥ १ ॥ सानथोरहोतींमिळालींअपार ॥ याचेधुधुः
कारेंनिवारिलीं ॥ २ ॥ निघतांआपटीधरोंधांवेमधीं ॥
येकाचेचीवंदिमाथांपाये ॥ ३ ॥ येकीजीवदिलाये
तांचीत्याधाकें ॥ येतीलतीयेकेंकाकुळती ॥ ४ ॥ यथेष्ट
भक्षिलेंपोटधायवरी ॥ तंवह्मणेहरिपुरेआतां ॥ ५ ॥
आतांकरूंकामआलोंजयासाठीं ॥ हरिघालीमीठीका
ळीयास ॥ ६ ॥ त्यासीनाथुनीयांनाकींदिलीदोरी ॥ चें
डूभारसीरींकळंबाचा ॥ ७ ॥ चालविलावरीबैसेनारा
यण ॥ खगआलिंगूनबहुडवी ॥ ८ ॥ विसरूनपडेसंव
गडेगाई ॥ यमुनेच्याडोहींलक्षत्यांचें ॥ ९ ॥ त्याच्यागो
ष्टिकांठींबैसौनीसांगती ॥ बुडालादावीतीयेथेंहरि ॥

॥ १० ॥ हरीचेंचिंतनकरीतांआठव ॥ तुकाह्मणेदेव आलावरी॥ ११॥ • ॥४४॥
अवचितात्यांनीदेखीलाभुजंग ॥ पळतीलमगहाऊं आला ॥ १ ॥ आलाघेऊनीयांयमुनेबाहेरी॥ पालवितोहरिगडीयांसी॥ २ ॥ गडियांसींह्मणेवैकुंठनायक॥ यारसकळिकमजपासीं॥ ३ ॥ मजपासींतुह्माभयकायकरी॥ जवळीयादूरीजाऊंनका॥ ४ ॥ कानींआयिकीलेगोविंदाचेबोल॥ ह्मणतीनवलचलापाहूं ॥ ५ ॥ पाहूंआलेहरीजवळीसकळ॥गोधनेंगोपाळआलिंगीले॥ ६ ॥ आल्यागाईवरीघालीतीलमाना॥ वोरसिलेस्तनक्षीरलोटें॥७॥ लोटतीसकळयेकावरीयेक॥ होऊनीपृथककुरवाळीती॥८॥कुर्वाळीआनंदेंघेतीचारापाणी॥तीहींचक्रपाणीदेखीयेला॥९॥त्याचपाशींहोतापरीकेलीमाव॥ नकळेसंदेहपडीलायां॥१०॥ यातिवृक्षवल्लीहोत्याकोमाईल्या ॥ त्यांसिकृष्णेंकायादिव्यदीली ॥ ११ ॥ दिलेंगोविंदेंत्यापदानाहींनाश ॥ तुकाह्मणे आसनिरसली॥ १२॥ ॥४५॥
आसनिरसलीगोविंदाचेभेटी ॥ संवसारातुटीपुढीलीया॥ १ ॥ पुढेंपाठविलेगोविंदगोपाळ॥ देऊनीचपळहातीगुंढी ॥ २ ॥ हांकाआरोळीयादेऊनिनाचती॥ येकासदावितीहरिआला॥ ३॥ अरधीपडलीहोतीजयाघरी॥ संकीर्णत्यानारीनरलोक॥ ४ ॥ लोकांभूकताननाहींनिद्राडोळा॥ रूपवेळोवेळांआठवीती ॥ ५ ॥ अ

हाकटामगकरीतगेलिया ॥ आधीठावातयांनाहींको
णीं ॥ ६ ॥ अर्धीचुकीमगघडेआठवण ॥ तुकाह्मणेज
नपरिचये ॥ ७ ॥ ॥ ४६ ॥

जननीयेह्मणेआह्माकायझालें ॥ अंकितारक्षिलेंकाय
काज ॥ १ ॥ कायकाजआतांहरीवीणजीणें ॥ नित्यदुः
खकोणेंसोसावेंहें ॥ २ ॥ हेंदुःखनसरेहरिनभेटतां ॥
त्याचेमागेंजातांयेकवेळा ॥ ३ ॥ येकवेळाजरीदेखतें
मीआतां ॥ तरींजीवापरतानकरीतें ॥ ४ ॥ करितांह्मा
ताहरीचेंचिंतन ॥ शुभतोशकुनतुकाह्मणे ॥ ५ ॥ ४७ ॥
शुभमाततीहीआणिलीगोपाळीं ॥ चेंडूवनमाळीघेउ
नीआला ॥ १ ॥ आलीद्वारादेखेहारुषाचीगुढी ॥ सां
गीतलीपूढीहारुषमात ॥ २ ॥ हारुषलीमाताकेलेंनिंब
लोण ॥ गोपाळावरूनकूरवंडी ॥ ३ ॥ गोपाळाभोंवतें
मिळालेंगोकुळ ॥ अवघींसकळसानथोर ॥ ४ ॥ थोर
सुखझालेंतेकाळींआनंद ॥ सांगतीगोविंदवरीआला
॥ ५ ॥ आलेवरीबैसोनियांनारायण ॥ काळीयानाथू
नवहनकेलें ॥ ६ ॥ नगराबाहेरीनिघालेआनंदें ॥ ला
वोनीयांवाद्येंनानाघोषें ॥ ७ ॥ नारायणापूढेंगोपाळ
चालती ॥ आनंदेंनाचतीगातीगीत ॥ ८ ॥ तंवदेखिये
लावैकुंठींचापती ॥ लोटांगणेंयेतीसकळही ॥ ९ ॥ स
कळहियेकाभावेंआलिंगीले ॥ अवघियांझालेअवघे
हरी ॥ १० ॥ हरिआलिंगूनीहरीरूपझालीं ॥ आपविस
रलीं आपणासी ॥ ११ ॥ सकळांसिसुखयेकदिलेंदेवें ॥

मायबापभावेंलोकपाळा ॥ १२ ॥ मायबापदेवानाहीं
लोकपाळ॥ सारिखीसकळतुकाह्मणे ॥ १३ ॥ ४८ ॥
नेणेवर्णधर्मजींआलींसामोरीं ॥ अवघींचहरीआलिं
गीलीं ॥ १ ॥ हरिलोकपाळआलेनगरांत ॥ सकळांस
हितमायबाप ॥ २ ॥ पारणेंतयांचेंझालेंयेकवेळे ॥ दे
खीलेंसांवळेंपरब्रह्म ॥ ३ ॥ ब्रह्मानंदेंलोकसकळनाच
ती॥ गुढीयाउभवितीघरोघरीं ॥ ४ ॥ घरोघरींसुखआ
नंदसोहळा ॥ सडेरंगमाळाचौकद्वारीं ॥ ५ ॥ दारींवृंदा
वनेंतुळसीचींबनें ॥ रामकृष्णगाणेंनारायण ॥ ६ ॥ ना
रायणतींहींपुजीलाबहूतीं ॥ नानापुष्पयातीकरोनीयां
॥ ७ ॥ यांचेंरीणनाहींफिटलेंमागील ॥ पुढेंभांडवलजो
ढीतीहीं ॥ ८ ॥ हींनङ्कतींकधींयाद्देवावेगळीं ॥ केलावन
माळीसेवारूणी ॥ ९ ॥ सेवारुणीतुकाह्मणेरूपधरी ॥
भक्तांचाकैवारीनारायण ॥ १० ॥ ॥ ४९ ॥
नारायणआलेनिजमंदिरासी ॥ जावेंयालोकांसींबहू
ढवी ॥ १ ॥ बहूडवीबहूकेलेंसमाधान ॥ विसरूंहा
क्षणनकोमाझा ॥ २ ॥ मातसांगीतलीसकळवृत्तांत ॥
केलेंदंडवतसकळांनीं ॥ ३ ॥ सकळांभातूकेंवांटिल्या
साखरा ॥ आपुलाल्याघरागेलेलोक ॥ ४ ॥ लोकगेले
कामागाईपेंगोपाळ ॥ वारीलेसकळलोभासाठीं ॥ ५ ॥
लोभदाऊनीयांआपुलाविसर ॥ पाडितोकुमरधनआ
शा ॥ ६ ॥ आशेचेबांधीलेतुकाह्मणेजन ॥ कायनारां

यणऐसेंजाणे ॥ ७॥ ॥ ६ ॥ ॥ ५० ॥
झालाकवतुककरितारोकडें ॥ आणिकहिपुढेंनाराय
ण ॥ १ ॥ येऊनियांपुढेंधरिलामारग ॥ हरावयाभाग
इंद्रापाजी ॥ २ ॥ इंद्रादहींदूधनेतांतूपलोणी ॥ घेतलेंहि
रोनीवाटेल्याचें ॥ ३ ॥ हिरोनीघेतल्याकावडीसकळ ॥
ह्मणतीगोपाळबरेंनव्हे ॥ ४ ॥ नव्हेतेंचिकरीनभीक
ळिकाळा ॥ तुकाह्मणेलीळाखेळेदेव ॥ ५ ॥ ॥ ५१ ॥
खेळनव्हेबराइंद्रकोपलीया ॥ देवह्मणेतयांभीऊंनका
॥ १ ॥ नकाधरूंभयधाककांहींमनीं ॥ बोलेचक्रपाणी
गौळीयांसी ॥ २ ॥ गौळीयांसीधीरनाहींयावचनें ॥
आशंकितमनेंवेडावलीं ॥ ३ ॥ वेडावलींत्यांसनकळ
तांमाव ॥ देवाआधिदेवनोळखती ॥ ४ ॥ नोळख
तांदुःखवाहातीशरीरीं ॥ तुकाह्मणेवरीभारपाठी ॥
॥ ५ ॥ ॥ ५२ ॥
पाठीभारवाहीनोळखेअनंता ॥ जवळीअसतांअंग
संगें ॥ १ ॥ अंगसंगेंतयानकळेहादेव ॥ कळोनिसं
देहमागुताला ॥ २ ॥ मागुतिपडतिचिंतेचीयाडोहीं ॥
जयाचीयेनाहींबुद्धिस्थीर ॥ ३ ॥ बुद्धिस्थीरराहोनेंदी
नारायण ॥ आशाबद्धजनलोभीकाची ॥ ४ ॥ लोभी
कांनकळेदेवाचेंकरणें ॥ तुकाह्मणेतेणेंदुःखिहोती ॥
॥ ५ ॥ ॥ ५३ ॥
दुःखीहोतीलोभीकरावेंतेंकाई ॥ उडतीलगाईह्मैसी
आतां ॥ १ ॥ आणिकहिकांहींहोईलअरिष्ट ॥ नायके

हाधीटसांगीतलें ॥ २ ॥ सांगोंचलायाच्यामायबापा
पाशीं ॥ निघालींघरासिदेवारागें ॥ ३ ॥ रागेंकाला
देतांनघेतीकवळ ॥ टोकवीगोपाळक्रोधेंयासी ॥ ४ ॥
क्रोधेंदेवावरीधरियेलाराग ॥ तुकाह्मणेभागनलभती
॥ ५ ॥ ॥ ५४ ॥

भागत्यासुखाचेवांकड्याबोबड्या ॥ आपुलियागड्या
भाविकांसी ॥ १ ॥ भारवाहीगेलेटाकोनीकावडी ॥
नवनीतगोडीभाविकांसी ॥ २ ॥ कालाकरोनीयांवां
टितीसकळां ॥ आनंदेंगोपाळांमाजिखेळे ॥ ३ ॥ खे
ळींमेळींदहींदुधलोणीखाती ॥ भयनाहींचित्तींकव
णाचें ॥ ४ ॥ कवणाचेंचालेतुकाह्मणेबळ ॥ जयासी
गोपाळसाह्यझाला ॥ ५ ॥ ॥ ५५ ॥

जाणवलेंइंद्राचरित्रसकळ ॥ वांकुल्यागोपाळदावीता
ती ॥ १ ॥ तांतडीनेंमेघाआज्ञाकरीरावो ॥ गोकुळींचा
ठावोउरोनेदी ॥ २ ॥ नेदावयागाईह्मैसीवांचूंलोक ॥
पुरासकळिकशिळाधारी ॥ ३ ॥ धाकनाहींमाझागौ
ळीयांच्यापोरां ॥ सकळीकांमाराह्मणेमेघा ॥ ४ ॥ ह्म
णवितीदेवआपणातंवरी ॥ नाहींजववरीकोपलोंमी ॥
॥ ५ ॥ मीपणेंहादेवनकळेचित्यासी ॥ अभिमानरासी
गर्वाचीया ॥ ६ ॥ अभिमानरासीजयाचीयाठायीं ॥
तुकाह्मणेतईदेवदूरी ॥ ७ ॥ ॥ ५६ ॥

देवत्याफावलाभावीकांगोपाळा ॥ नाहींतेथेंकळाअ
भिमान ॥ १ ॥ नाडीलीआपल्याआपणचियेकें ॥ संद

हृदायकेंबहूफार ॥२॥ फारचाळवीलींकळोंनेदीमाव ॥
देवा आधिदेवविश्वंभर ॥३ ॥विश्वासावांचोनीकळोंन
येखरा ॥ अभक्ताअधीराजैसातैसा ॥ ४ ॥ जैसाभाव
तैसाजवळीत्यादूरी ॥तुकाह्मणेहरिदेतोघेतो ॥ ५॥५७॥
तोयासाचभावनकळेचिइंद्रा ॥ ह्मणवोनिधाराघाली
मेघा ॥ १ ॥ घालीमेघधाराकडाडीलामाथा ॥ वरि
अवचितादेखीयेला ॥ २ ॥ देखतीपाऊसवोळलागो
पाळ ॥भ्यालेहिसकळविचारीती ॥ ३ ॥ विचारींपडी
लेविसरलेखेळ ॥ अन्यायगोपाळह्मणतीकेला ॥ ४ ॥
लागलेंसेगोडनकळेत्याकाळीं ॥ भेणेंवनमाळीआठ
विती ॥५॥ आतांकायकैसाकरावाविचार ॥गोधनासी
थारआपणिया ॥ ६ ॥ याचीयाविचारेंहोणारतेंका
यी ॥ तुकाह्मणेठायींवेडावलीं ॥ ७॥ ॥५८॥
वेडावलींकायकरावेंयाकाळीं ॥ ह्मणेवनमाळीगोपा
ळांसी ॥ १ ॥ शिरींगोवर्धनधरूंउचलोनी ॥ ह्मणेतुह्मी
कोण्हीभेऊंनका ॥ २ ॥ नकासांडोंकोण्हीआपलाआ
वांका ॥ मारितीयाहाकाआरोळीया ॥ ३॥ आशंकि
तचित्तेंनवाटेत्यांखरें ॥ धाकेंचित्तेंबरेंह्मणतीचला ॥४॥
चित्तींधाकपरीजवळीअनंत ॥ तुकाह्मणेघातहोऊंने
दी ॥ ५॥ ॥५९॥
नेदीदुःखदेखोंदासानारायण ॥ ठेवीनिवारूनआल्या
आधी ॥ १ ॥ आधींपुढेंशुद्धकरावामारग ॥दासामागें
मागेंसुखरूप ॥ २ ॥ पर्वतासीहातलावीलाअनंतें ॥ तो

जायेवरुतेंआपेआप ॥ ३ ॥ आपुल्याआपणउचली
लागीरी ॥ गोपाळहेंकरीनिमित्यासी ॥ ४ ॥ निमित्य
करोनीकरावेंकारण ॥ करितांआपणकळोंनेदी ॥ ५ ॥
दीनाचाकृपाळपतितपावन ॥ हेंकरीवचनसाचखरें ॥
॥ ६ ॥ सांगणेंनलगेसुखदुःखदासा ॥ तुकाह्मणेऐसा
रुपावंत ॥ ७ ॥ ॥ ६० ॥

रुपावंतेंहाकदिलीसकळिकां ॥ माजियारेनकाराहों
कोण्ही ॥ १ ॥ निघालीयाजनपाउसाच्याभेणें ॥ देखे
गोवर्धनउचलीला ॥ २ ॥ लाविलेगोपाळफेरीचहुंक
डे ॥ हांसेफुंदेरडेकोण्हीधाकें ॥ ३ ॥ धाकेंहिसकळनि
घालेभीतरी ॥ उचलीलागिरीतयाखालीं ॥ ४ ॥ तया
खालीं आलेवत्सेंगाईलोक ॥ पक्षीसकळिकजीवजा
ती ॥ ५ ॥ जिहींह्मणविलेहरिचेअंकित ॥ जातीचेतेहो
तकोणीतरी ॥ ६ ॥ जातिकुळनाहींतयांसिप्रमाण ॥
अनन्याअनन्यतुकाह्मणे ॥ ७ ॥ ॥ ६१ ॥

त्यांसीराखेंबळेंआपुलेजेदास ॥ कळिकाळावासपा
होंनेदी ॥ १ ॥ पाऊसनयेतांकिलीत्यांचीथार ॥ लाग
लातूसारयेऊंमग ॥ २ ॥ येऊंनीदगडबैसतीलगीरी ॥
वरुषलाधारीशिळाचिया ॥ ३ ॥ शिळाचियाधारीव
रुषलाआकांत ॥ होतांदिससातयेकसरें ॥ ४ ॥ येकसरेंगी
रिधरिलागोपाळीं ॥ होताभावबळीआह्माऐसें ॥ ५ ॥
ऐसेंकळोंआलेंदेवाचीयाचित्ता ॥ ह्मणेतुह्मीआतांहा
तसोडा ॥ ६ ॥ हांसतीगोपाळकरोनीनवल ॥ ऐकोनी

याबोलगोविंदाचे ॥ ७॥ दावितीलडोयागुडघेकोंपर॥
फुटलेतोभारऊचलीतां ॥ ८ ॥ भारआह्मावरीघालो
नीनिराळा ॥ राहीलासीडोळाचुकऊनी॥ ९ ॥ निमि
त्याआंगोळीलावियेलीवरी ॥ पाहोंकैसागीरिधरितो
सि ॥ १० ॥ शिणलेहिहोतेडोईच्यात्याभारें ॥ लटिकें
चिखरेंमानुनीयां ॥ ११ ॥ यांनीअंतपाहोंआदरीला
याचा॥ तुकाह्मणेवाचावाचाळते॥ १२ ॥ ॥ ६२॥
वाचाळलटिकेअभक्तजेखळ ॥ आपुलेंतेबळवाखा
णिती ॥ १ ॥ बळेंहुंबरतीसत्यत्यांनकळे॥ नुघडतीडो
ळेआंधळ्याचे ॥ २॥ आसुडल्यामानाहातपायनेटे॥
तंवभारबोटेंऊचलीला ॥ ३ ॥ लटिकाचीआह्मीशीण
केलादेवा॥ कळोंआलेंतेह्वांसकळांसी ॥ ४ ॥ आलें
कळोंतुकाह्मणेअनुभवें ॥ मगअहंभावेंसांडवले ॥
॥५॥ ॥६३॥
सांडवलेसकळांचेअभिमान॥ आणिलेशरणलोटांग
णीं॥ १ ॥ लोटांगणींआलेहोऊनियांदीन ॥ मगनारा
यणह्मणेभले॥ २॥ भलाआजितुह्मीकेलासाचपण॥
गिरिगोवर्धनऊचलीला ॥ ३ ॥ लागतिचरणासकळ
तेकाळीं॥ आह्मामध्येंबळीतूंचियेक ॥ ४॥ येकातुज
वीणनयोंआह्मीकामा ॥ कळोंकृष्णरामाआलेंआजी
॥ ५ ॥ आजिवरीआह्मांहोताअभिमान॥ नेणतांचर
णमहिमातूझा ॥ ६ ॥ तुझापारआह्मीनेणोंनारायणा
नखेंगोवर्धनाराखियेलें॥ ७॥ राखीलेंगोकुळआह्मास

कळांसी ॥ दगडाच्याराशीवरूषतां ॥ ८ ॥ वर्णावेंतेंकाई
तुझेंमहिमान ॥ धरितीचरणसकळहि ॥ ९ ॥ सकळहिता
हानविसरलेभूक ॥ सकळहिसुखदिलेंत्यांसी ॥ १० ॥
त्यांसिकळोंआलावैकुंठनायक ॥ तुकाह्मणेलोकनिर्भ
यते ॥ ११ ॥ ॥ ६४ ॥

लोकांकळोंआलेंदेवआह्मामधीं ॥ टाकीलीउपाधिते
हिशंका ॥ १ ॥ शंकानाहींथोरलहानाजीवासी ॥ कळ
लाहृषीकेशीतेह्वांमग ॥ २ ॥ मगमनींझालेनिर्भयसक
ळ ॥ संगेंलोकपाळकृष्णाचीया ॥ ३ ॥ कृष्णाचीयावो
व्यागाणेंगातीगीत ॥ कृष्णमयचित्तझालेंत्यांचें ॥ ४ ॥
त्यांसीठावनाहींबाहीरीलभाव ॥ अंतरींचवावझालेंसू
ख ॥ ५ ॥ सुखतयांदीसेनकळेहेराती ॥ अखंडहेज्योती
गोविंदाची ॥ ६ ॥ चिंतनेंचिधालींनलगेअन्नपाणी ॥
तुकाह्मणेमनींसमाधान ॥ ७ ॥ ॥ ६५ ॥

समाधानत्याचींइंद्रियेंसकळ ॥ जयातेंगोपाळसमा
गमें ॥ १ ॥ गोविंदाचाझालाप्रकाशभीतरीं ॥ मग
त्याबाहेरीकायकाम ॥ २ ॥ कामकाजत्यांचेंसरलेंअ
पार ॥ नाहींआपपरमाझेंतुझें ॥ ३ ॥ मायासकळाची
सकळाहिवरि ॥ विषमतेहरिदिसोंनेदि ॥ ४ ॥ दिसेत
याआपपरावेंसारिखें ॥ तुकाह्मणेसुखेंकृष्णाचीया
॥ ५ ॥ ॥ ६६ ॥

कृष्णाचीयासुखेंभूकनाहींताहन ॥ सदासमाधानसक
ळांचें ॥ १ ॥ कळलेंचिनाहींझालेकितीदीस ॥ बाहेरील

वासविसरलीं ॥ २॥ विसरुकामाचातुकाह्मणेझाला॥
उद्योगराहीलायावेंजावें ॥ ३॥ ॥ ६७॥
जावेंबाहेरीहानाठवेविचार ॥ नाहींसमाचारठावाकां
हीं॥ १ ॥ कांहींनकळेतेंकळों आलेंदेवा ॥मांडीलारिघा
बाकवतुक ॥ २ ॥ कवतुकासाठींभक्तदेहावरी ॥ आ
णीताहेहरिबोलावया ॥ ३ ॥ यासीनावरूपनाहींहाआ
कार ॥ कळलासाचारभक्तामुखें ॥ ४ ॥ मुखेंभक्तांची
याबोलतोआपण ॥ अंगसंगभिन्ननाहींदोघां ॥ ५ ॥
दोघेवेगळालेदेखिलजोकोण्ही ॥ तयाचामेदीनीबहु
भार ॥ ६ ॥ तयासिघडलींसकळहिपापें ॥ भक्ताचिया
कोपेंनिंदाद्वेषें ॥ ७ ॥ द्वेषीयाचासंगनघडावाकोण्हा ॥
विषजेविप्राणानाशकरी ॥ ८ ॥ करितांजोऐकेनिंदा
यासंतांची ॥ तयाहोतीतेंचिअधःपात ॥ ९ ॥ पतनउ
द्धारसंतांचामहिमा ॥ त्यजावेंअधमासंतसेवीं ॥ १० ॥
सेवीसंतजोडेमहालाभरासी ॥ तुकाह्मणेत्यासीनाश
नाहीं ॥ ११ ॥ ६८ ॥
नाहींनाशहरिआठवितांमुखें ॥ जोडतीलसुखेंसकळ
हि ॥ १ ॥ सकळहिसुखेंवोळलींअंतरीं ॥ मगत्याबाहे
रीकायकाज ॥ २ ॥ येऊंविसरलेबाहीरगोपाळ ॥ तह्ली
नसकळकृष्णसुखें ॥ ३ ॥ सुखतेंयोगियांनाहींसमाधी
स ॥ दिलेगाईवत्सपशुजीवा ॥ ४ ॥ वारलापाऊसको
ण्हानाहींठावा ॥ तुकाह्मणेदेवावांचूनियां ॥ ५ ॥ ६९ ॥
यांसिसमाचारसांगतोसकळां ॥ चलावेंगोपाळाह्म

णेदेवा॥ १ ॥ देवराखेतयांआडलियाकाळें ॥ देवसुख
फळदेतोदासां॥ २ ॥ दासांदुःखदेखोनदीआपुलीया ॥
निवारीआलीयानकळतां ॥ ३ ॥ नाहींमिघयेतांजाता
देखियेला ॥ धारींवरुषलाशिळाचीया ॥ ४ ॥ येऱ्हडें
सांकडेंभक्ताचेंअनंता ॥ होयनिवारितातुकाह्मणे ॥
॥ ५ ॥ ॥ ७० ॥
काकुळतीयेकपाहातिबाहेरी ॥ तयाह्मणेहरिवोसरला
॥ १ ॥ वोसरलामेघआलाहोताकाळ॥ बाहेरीसंकळ
आलेलोक ॥ २ ॥ कवतुकझालेंतेकाळींआनंद॥ कळ
लागोविंदसाचभावें ॥ ३ ॥ भावेंतयापुढेंनाचतीस
कळ॥ गातीलमंगळवोव्यागीत ॥ ४ ॥ गीतगातीवो
व्यारामकृष्णावरी॥ गोपाळमोहरीवातीपांवे॥ ५ ॥ व
त्सेंगाईपशुनाचतीआनंदें॥ वेधलींयाछंदेंगोविंदाच्या
॥ ६ ॥ चित्तवेधियेलेंगोविंदेजयांचें ॥ कोणतेदैवाचेत
यांहूनी ॥ ७ ॥ तयांहूनकोणनाहींभाग्यवंत ॥ अखंड
सांगातेंगोविंदाच्या ॥ ८ ॥ गोविंदाचासंगतुकाह्मणे
ध्यान॥ गोविंदतेजनगोकुळींचे॥ ९ ॥ ॥ ७१ ॥
गोकुळींचीगतिकोणझालीपरी ॥ पाहोंआलावरिइंद्र
राव ॥ १ ॥ इंद्रापासींमिघबोलतीबडीवार॥ सकळसं
व्हारकरूनिआलों ॥ २ ॥ आतांजीवनाहींसांगावया
ह्मणी॥ पुरलेपाषाणीशिळाचिया॥ ३ ॥ रिताकोठनाहीं
उरोंदिलाठाव ॥ जल्पतीतोभावनकळतां ॥ ४ ॥ नक

ळतांदेववहूहुंबरती ॥ साचतींपावतीअपमान ॥ ५ ॥
मावनकळतांकिलीतोंडपिटी ॥ इंद्रआलादृष्टीपाहावया
॥ ६ ॥ पाहातांतेआहेजैसेंहोतेंतैसें ॥ नाचतीविशेषेंतुका
ह्मणे ॥ ७ ॥ ॥ ७२ ॥
नाचतांदेखीलेगाईवत्सेंजन ॥ विस्मितहोऊनइंद्रठे
ला ॥ १ ॥ लागलापाऊससीळांचीयाधारी ॥ वांचली
हेपरीकैसीयेथें ॥ २ ॥ येथेंनारायणसंदेहचीनाहीं ॥
विघ्नकेलेंठाईनिर्विघ्नतें ॥ ३ ॥ विचारीतांऊचलिलागो
वर्धन ॥ अवतारपूर्णकळोंआला ॥ ४ ॥ आलागौळीयां
च्याघरानारायण ॥ करीतोस्तवनइंद्रत्याचें ॥ ५ ॥ त्या
च्यापुण्यापारकोणकरीलेखा ॥ नव्हेचतुर्मूखाब्रह्मया
सी ॥ ६ ॥ शिणतोयाध्यानानयेयेकवेळा ॥ तातयागो
पाळासमागमें ॥ ७ ॥ समागमेंगाईवत्सेंपुण्यवंता ॥ देह
कुर्वाळितांअंगसंगें ॥ ८ ॥ संगझालामायबापलोकपा
ळा ॥ आलींगितीगळाकंठाकंठ ॥ ९ ॥ करितीलवृष्टिपुष्प
वरुषाव ॥ देवाअधिदेवपूजीयेला ॥ १० ॥ करितहेझाले
स्तुतिसकळिक ॥ देवइंद्रादिकगोविंदाची ॥ ११ ॥ पु
ष्पांजुळीमंत्रघोषजयजयकार ॥ दुमदुमीअंबरतेणेंना
दें ॥ १२ ॥ नामाचागजरगंधर्वांचींगाणीं ॥ आनंदत्रि
भुवनींनसमाये ॥ १३ ॥ तोसुखसोहळाअनुपम्यरासी
गोकुळींदेवासींदोहींठाईं ॥ १४ ॥ दोहींठाईंसुखदिलें
नारायणें ॥ गेलादरुशनेंवैरभाव ॥ १५ ॥ भावनाभे

दाचीजायउठाऊठी ॥ तुकाह्मणेभेटीगोविंदाचे ॥
॥१६॥ ॥६॥ ॥६॥ ॥६॥ ॥७३॥
गोविंदाचेंनामगोडघेतांवाचे ॥ तेथेराहेकैंचेवैरभाव
॥१॥भावेंनमस्कारघातलासकळीं ॥ लोटांगणतळीं
महीवरी॥ २॥वरिहातबाहेउभारिलादेवें ॥कळलियां
भावेंसकळांच्या॥३॥सकळहिवरीबह्नडविस्थळा॥च
लावेंगोपाळाह्मणेघरा॥४॥ लागलेतेनाचोंगोविंदा
च्याबोलें॥पडलियाडोलेछंदहोते॥५॥छंदतोनावरेआ
पलाआपणा॥ आनंदाचाआलाहोतात्यांसी॥६॥त्यां
सितुकाह्मणेंआनंदसकळां॥ठेंगणेगोपाळासमागमें॥
॥७॥ ॥७४॥
समागमेंहरिअसेनेणतीया॥नेदीजावोवायांअंकिता
सि॥१॥अंकितासावधकेलेंनारायणें॥गोपाळगोध
नेंसकळहि॥२॥सकळहेजनआलेगोकुळासी ॥ आ
नंदमानसींसकळांच्या॥३॥सकळांचाकेलाअंगिका
रदेवें॥नकळतांभावेंवाचवीत्यां॥४॥ त्यांझालानिर्द्धा
रहरिआह्मापासीं॥निवांतमानसींनिर्भयते॥५॥निर्भ
यहेजनगोकुळींचेंलोक॥केलेसकळिकनारायणें॥६॥
नारायणभयेंयेवोनेदीगांवा ॥ तुकाह्मणेनावाअनुस
रेत्या॥७॥ ॥७५॥
अनुसरेतयाफिरोंनेदीमागें॥राहेसमागमेंअंगसंगें॥
॥१॥ अंगसंगिअसेकर्मसाक्षीदेव॥जैसाज्याचाभा
वतैसेंफळ॥२॥फळपाकीभोगदेतीलप्राणीये॥तुका

ह्मणेनयेसर्वेंकांहीं॥ ३॥ ॥७६॥

यादशेचरित्रकेलेंनारायणें ॥ रांगतांगोधनेंराखिताहे ॥ १ ॥ हेंसोंगसारीलेंयारूपेंअनंतें ॥ पुढेंहिबहुतेंकरणें आहे ॥ २ ॥ आहेतुकाह्मणेधर्मसंस्थापन॥ केलानारायणेंअवतार॥ ३ ॥ ॥७७॥

अवतारकेलासंह्वारायादुष्ट ॥ करितीतनष्टपरपीडा ॥ ॥ १ ॥ परपीडाकरिदैत्यकंसराव ॥पुढेंतोहिभावआरंभिला॥ २ ॥ लाविलेंलाघवपाहोनीयासंधि॥सकळहिवधीदुष्टजन ॥ ३ ॥दुष्टजनपरपीडकजेकोण्ही॥ तयाचक्रपाणीनसाहाति ॥ ४ ॥ नसाहावेदुःखभक्तांचेंयादेवा॥ अवतारघ्यावालागेरूप ॥ ५ ॥ रूपहेंचांगलेंरामकृष्णनाम ॥ हरेभवभ्रमउच्चारीतां ॥ ६ ॥ उच्चारितांनामकंसवैरभावें ॥ हरोनियाजीवेंकृष्णकेला ॥ ॥ ७ ॥ कृष्णरूपेंत्यासीदिसेअवघेजन ॥ पाहेतोंआपणकृष्णझाला ॥ ८ ॥ पाहिलेंदर्पणींआपल्यामुखासी ॥ चतुर्भूजत्यासीतोचिझाला॥ ९ ॥ झालींकृष्णरूपकन्यापुत्रभाज॥तुकाह्मणेराज्यसैन्यजन॥ १० ॥ ॥७८॥

सैन्यजनहांसेरायाझालेंकाई ॥ वासयेतोठाईआपणासि॥ १ ॥ आपणाआपणजायसतीजैसी॥वैरभावज्यासीभक्तिनाहीं ॥ २ ॥ नाहींयाचात्याचाभावएकविध॥ह्मणऊनिछंदवेगळाले ॥ ३ ॥ वेगळाल्याभावेंतेतयाहांसती ॥ तयासीदीसतीअवघींहरि ॥ ४ ॥ हरी

---

(१) हरण केला.

लाकंसाचाजीवभावदेवें ॥ द्वेषाचीयाभावेंतुकाह्मणे ॥
॥ ५ ॥ ॥ ७९ ॥

द्वेषाचीयाभावेंहरिरूपझाले ॥ भावहारपलेंदेहादिक ॥
॥ १ ॥ देहादिककर्मेंअभिमानवाढे ॥ तयाकैसाजोडेना
रायण ॥ २ ॥ नारायणजोडेयेकविधभावें ॥ तुकाह्म
णेजिवेंजाणेलागे ॥ ३ ॥ ॥ ८० ॥

जीवभावत्याचागेलाअभिमान ॥ ह्मणऊनीजनहांसे
कंसा ॥ १ ॥ सावधकरितांनयेदेहावरी ॥ देखोनियांदू
रीपळेजना ॥ २ ॥ जनवनहरिझालासेआपण ॥ मग
हेलोचनझांकीयेले ॥ ३ ॥ झांकोनीलोचनमौन्यचीरा
हिला ॥ नाहींआतांबोलायाचेंकाम ॥ ४ ॥ बोलायासी
दूजेंनाहींहेंराहिलें ॥ जनकृष्णझालेस्वयेंरूप ॥ ५ ॥ रूप
पालटलेंगुणनामयाती ॥ तुकाह्मणेभूतींदेवझाला ॥
॥ ६ ॥ ॥ ८१ ॥

झालास्वयेंकृष्णआठवहाचित्तीं ॥ भेदभयवृत्तिउरली
से ॥ १ ॥ उरलेंहेंरूपनावदिसेभिन्न ॥ मीआणिकृष्णआ
ठवतो ॥ २ ॥ तोंवरिहादेवनाहींतयापासीं ॥ आलादि
सेत्यासीतोचिदेव ॥ ३ ॥ देवरूपत्यासीदिसेवरिकाया ॥
अंतरीतोभयाभीतभेदें ॥ ४ ॥ भेदेंतुकाह्मणेअंतरेगो
विंद ॥ साचेवीणछंदवायांजाये ॥ ५ ॥ ॥ ८२ ॥

वायांतैसेबोलहरीसीअंतर ॥ केलेहोतेंथारभयभेदें ॥
॥ १ ॥ भेदभयगेलेंनोळखेआपणा ॥ भेटीनारायणा
कंसाझाली ॥ २ ॥ झालीभेटीकंसाहरिसींनिकट ॥ स

न्मुखचिनीटयेरयेरा ॥ ३ ॥ येरयेरांभेटीयुद्धाच्याप्रसं
गा ॥ त्याचेशस्त्रेंअंगाहाणीतलें ॥ ४ ॥ त्याचेंवर्महोतेंठा
वेंयाअनंता ॥ तुकाह्मणेसत्तानायकहा ॥ ५ ॥ ॥ ८३ ॥
नारायणेंकंसचाणूरमर्दीलें ॥ राज्यींस्थापियेलेंउग्रसे
ना ॥ १ ॥ उग्रसेनस्थापीयेलाशरणांगत ॥ पुरवीलाअं
तअभक्तांचा ॥ २ ॥ अवघेचिकेलेकारणअनंतें ॥ आपु
लीयाहातेंसकळहि ॥ ३ ॥ सकळहिकेलींआपुलींअंकि
त ॥ राहेगोपीनाथमथुरेसी ॥ ४ ॥ मथुरेसिआलावैकुं
ठनायक ॥ झालेंसकळीकयेकराज्य ॥ ५ ॥ राज्यदिलें
उग्रसेनाशरणांगता ॥ सोडवीलींमातापितादोन्हीं ॥
॥ ६ ॥ सोडवणेंधांवेभक्तांच्याकैवारें ॥ तुकाह्मणेकरेंश
स्त्रधरी ॥ ७ ॥ ॥ ८४ ॥
धरीदोहीठाईंसारिखाचिभाव ॥ देवकिवसुदेवनंददो
घें ॥ १ ॥ दोघेंयेकेठाईंकेलींनारायणें ॥ वाढविलाती
णेंआणिव्यालीं ॥ २ ॥ व्यालावाढलाहाआपलाआप
ण ॥ निमित्ताकारणमायवाप ॥ ३ ॥ मायहाजगाची
बापनारायण ॥ दुजाकरीकोणयत्नयासी ॥ ४ ॥ कोण
जाणेयाच्याअंतरींचाभाव ॥ तुकाह्मणेमावकळोंने
दि ॥ ५ ॥ ॥ ८५ ॥
दिनाचाकृपाळदुष्टजनाकाळ ॥ येकलासकळव्याप
कहा ॥ १ ॥ हासेबोलेतैसानव्हेहाअनंत ॥ नयेतोप्राकृ
तह्मणोंयासि ॥ २ ॥ यासिकळावयायेकभक्तिभाव ॥
दुजानाहींठावधांडोळितां ॥ ३ ॥ धांडोळितांश्रुतिराहि

ल्यानिश्चित॥तोकरिसंकेतगोपींसवें ॥ ४ ॥ गोपीकां
चीवाटपाहेद्रुमातळीं॥मागुतान्याहाळीनदेखतां॥५॥
नदेखतांत्यासउठीबैसेपाहे॥वेडावलाराहेवेळोवेळां॥
॥ ६ ॥ वेळोवेळांपाहेपंथगोपिकांचा॥तुकाह्मणेवाचा
नातुडेतो॥ ७॥ ॥८६॥

तोबोलेकोमळनिष्ठुरसाह्नी ॥ कोपतांगौळणीहास्य
करी ॥ १ ॥ करावयादास्यभक्तांचेंनिर्लज्ज॥कवतुकें
रजमाथावंदी॥ २ ॥ दिल्हेंउग्रसेनामथुरेचेंराज्य॥सां
गीतलेंकाजकरीत्याचें ॥ ३ ॥ त्यासिकांहींहोतांअरिष्ट
निर्माण॥निवारीआपणशरणांगता॥ ४ ॥शरणांग
तराखेसर्वभावेंहरी॥अवतारधरीतयांसाठीं॥५॥ तयां
साठींवाहेसुदर्शनगदा ॥ उभाअसेसदासांभाळित॥
॥ ६ ॥ तळमळनाहींतुकाह्मणेचित्ता॥भक्तांचाअनंता
भारमाथा॥ ७॥ ॥८७॥

मारीलेअसुरवाढल्यांमेदिनी॥होतेकोण्हाकोणीपीडी
तते॥ १ ॥ तयांनारायणपाठवीअघोरा॥संताच्यामत्स
राघातावरी ॥ २ ॥ वरीलेतेदूतींयमाचियेदंडीं॥उच्चा
रितांतुंडींनारायण ॥ ३ ॥ नारायणनामनावडेजयां
सी॥तेझालेमिरासीकुंभपाकीं॥ ४ ॥ कुंभपाकींशेलमा
नतोतयांचा॥ तुकाह्मणेवाचासंतनिंदा ॥ ५ ॥ ८८ ॥

बासनारायणेंकेलामथुरेसि ॥ वधूनिदुष्टासितयेठाईं
॥ १ ॥ठाईंपितयाच्यामानीउग्रसेना॥प्रतिपाळिजना

(१) टाळले पाठ.

सर्वलोकां ॥ २ ॥ लोकांदुःखनाहींमागीलआठव ॥ दे
खियेलादेवदृष्टिंत्यानीं ॥ ३ ॥ देखोनियांदेवाविसरलि
कैसा॥ठावनाहींऐसाहोतातेथें ॥४॥ तयेंदुजाकोणीना
हींकृष्णावीण ॥ ऐसेंवाटेमनेकायावाचा ॥ ५ ॥ काया
वाचामनेंकृष्णींरतझाले ॥ सकळांलागलेंकृष्णध्यान
॥६॥ध्यानगोविंदाचेंलागलेंसेलोकां ॥ निर्भरहेतुकाह्म
णेचित्तीं ॥ ७ ॥ ॥ ८९ ॥
चिंतिलेपावलेजयाकृष्णभेटी ॥ येन्हवींतेअटिवायां
विण ॥ १ ॥ वासनाधरीतीकृष्णावीणकांहीं ॥ शिणके
लातीहिंसाधनांचा॥ २॥ चालवीलींदंभेंभयेंअहंकारें ॥
भोगजन्मांतरेंनचुकती ॥ ३ ॥ नचुकतिभोगतपेंदानेंव्र
तें ॥ येकात्या अनंतावांचुनियां ॥ ४ ॥ चुकउनिजन्मदा
खवीआपणा॥भजानारायणातुकाह्मणे॥५॥ ॥ ९० ॥
भजिल्यागोपीकासर्वभावेंदेवा ॥ नाहींचित्तींहेवादु
जाकांहीं ॥ १ ॥ दुजाछंदनाहींतयांचीयेमनीं ॥ जागृ
तींहीस्वप्नींकृष्णध्यान ॥ २ ॥ ध्यानज्याहरीचेंहरिसतया
चें ॥ चित्तगोहिज्याचेंतैशाभावें ॥ ३ ॥ भाग्यपूर्वपुण्य
आठवितिलोक ॥ अवघेसकळिकमथुरेचे ॥ ४ ॥ मथु
रेचेलोकसुखीकेलेजन ॥ तेथेनारायणराज्यकरी ॥ ५ ॥
राज्यकरिगोपीयादवांसहित ॥ कांमिलेबहुतकाळतेथें
॥ ६ ॥ तेथेंदैत्यींउपसर्गकेलालोकां ॥ रचिलीद्वारकातु
काह्मणे ॥ ७ ॥ ॥ ९१ ॥
रचियेलागांवसागराच्यापोटीं ॥ जडोनिगोमटींना

नारत्नें ॥ १ ॥ रत्नेंखणोखणीसोनीयाच्याभिंती ॥ लाग
लियाज्योतिनानांकळा ॥ २ ॥ कळासकळहिगोविंदा
चेहातीं ॥ मंदीरेंनिगुतिउभारीलीं ॥ ३ ॥ उभारिलींदुर्गें
दारवंटफांजी ॥ कोटीचर्यामाजिशोभलीया ॥ ४ ॥ शो
भलेउत्तमगांवसागरांत ॥ सकळांसहितआलेहरि ॥ ५ ॥
आलानारायणद्वारकानगरा ॥ उदारयासुरामुगुटम
णि ॥ ६ ॥ निवडिनायातिसमानचिकेली ॥ रणकधा
कुलींनारायणें ॥ ७ ॥ नारायणेंदिल्हींअक्षयमंदिरें ॥
अभंगसाचारेंसकळांसी ॥ ८ ॥ सकळहिधर्मशीळपु
ण्यवंत ॥ पवित्रविरक्तनारीनर ॥ ९ ॥ रचिलेंतेंदेवेंन
मोडेकवणा ॥ बळियाचाराणानारायण ॥ १० ॥ बळ
बुद्धिनीतीदेवाचीसारिखी ॥ तुकाह्मणेमुखींगातीवों
व्या ॥ ११ ॥ ॥ ९२ ॥
गातीवोंव्यांकामेंकरितांसकळ ॥ हालवितांबाळदेवा
वरि ॥ १ ॥ रिद्धिसिद्धिदासीदारींवोळंगति ॥ सकळसं
पत्तिसर्वांघरीं ॥ २ ॥ घरींबैसलीयाजोडलेंनिधान ॥ क
रितिकीर्तननारीनर ॥ ३ ॥ नारीनरधन्यधन्यत्याचिया
ति ॥ जयांसीसंगतिगोविंदाची ॥ ४ ॥ गोविंदेंगोविंद
केलेलोकपाळ ॥ चिंतनेंसकळतुकाह्मणे ॥ ५ ॥ ९३ ॥
काहींचिंताकोण्हानाहींकोणेविशीं ॥ करीद्वारकेशींरा
ज्यदेव ॥ १ ॥ द्वारकेशींराज्यकरीनारायण ॥ दुष्टसंहारू

(१) रविः पाठ. (२) वेशी.